# आत्मसाक्षात्कार

## प्राप्तीचे सरळ आणि अचूक विज्ञान



Marathi

ज्ञानी पुरुष दादाश्री ( दादा भगवान )

**ज्ञानीपुरुष परम पूज्य दादा भगवानांची दिव्य ज्ञानवाणी**

संकलन : पूज्यश्री दीपकभाई देसाई

# आत्मसाक्षात्कार
## प्राप्तीचे सरळ आणि अचूक विज्ञान

**प्रकाशक : अजीत सी. पटेल,** दादा भगवान आराधना ट्रस्ट, 5, ममतापार्क सोसायटी, उस्मानपुरा, अहमदाबाद – ३८००१४. फोन : (०७९) ३९८३०१००

© पूज्यश्री दीपकभाई देसाई, त्रिमंदिर, अडालज, जिला : गांधीनगर, गुजरात.

**प्रथम संस्करण** : ५,००० नोव्हेंबर, २०१६

**द्वीतीय संस्करण** : २,००० जानेवरी, २०१८

**द्रव्य मूल्य** : १० रुपये

**भाव मूल्य** : 'परम विनय' आणि 'मी काहीच जाणत नाही', हे भाव!

**मुद्रक** : अंबा ऑफसेट

B-99, इलेक्ट्रोनीक्स GIDC,

क-6 रोड, सेक्टर-25, गांधीनगर-382044

**फोन :** (079) 39830341

## दादा भगवान कोण ?

जून १९५८. संध्याकाळची अंदाजे सहाची वेळ. सुरत स्टेशनवर अलोट गर्दी होती. रेल्वेच्या प्लेटफॉर्म नंबर तीनच्या बाकावर बसलेले श्री. अंबालाल मूलजीभाई पटेल रुपी देहमंदिरात नैसर्गिक स्वरूपात कित्येक जन्मांपासून व्यक्त होण्यासाठी आतूर असलेले 'दादा भगवान' संपूर्णपणे प्रकट झाले आणि निसर्गाने सर्जन केले अध्यात्माचे अद्भूत आश्चर्य! एका तासात विश्वदर्शन लाभले. मी कोण? भगवंत कोण? जग कोण चालवत आहे? कर्म म्हणजे काय? मुक्ती कशाला म्हणतात? इत्यादी जगातील सर्व आध्यात्मिक प्रश्नांचे रहस्य पूर्णपणे प्रकट झाले. अशा प्रकारे निसर्गाने विश्वाला प्रदान केले एक अद्वितीय, संपूर्ण दर्शन आणि याचे माध्यम बनले अंबालाल मूलजीभाई पटेल. जे होते गुजरातच्या चरोतर जिल्ह्यातील भादरण गावचे पाटील. कॉन्ट्रॅक्टचा व्यवसाय करणारे आणि तरीही पूर्ण वीतराग पुरुष.

त्यांना जे ज्ञान प्राप्त झाले तसेच फक्त दोन तासात इतर मुमुक्षुंना सुद्धा आत्मज्ञान प्राप्त करून देत असत त्यांच्या सिद्ध झालेल्या अद्भूत ज्ञान प्रयोगाद्वारे. त्याला अक्रम (क्रमविरहीत) मार्ग म्हटले जाते. अक्रम म्हणजे क्रमाशिवायचा आणि क्रम म्हणजे पायरी पायरीने. क्रमाक्रमाने वर चढणे. अक्रम म्हणजे लिफ्ट मार्ग – शॉर्ट कट...!

ते स्वत: प्रत्येकाला 'दादा भगवान कोण?' याबद्दलची फोड करून देताना म्हणायचे की, ''हे दिसतात ते 'दादा भगवान' नाहीत. हे तर ए.एम. पटेल आहेत. आम्ही ज्ञानीपुरुष आहोत आणि आत प्रकट झाले ते दादा भगवान आहेत. दादा भगवान तर 'चौदालोक' चे नाथ आहेत, ते तुमच्यात पण आहेत, सर्वांमध्ये आहेत. तुमच्यात अव्यक्त रुपात आहेत आणि 'येथे' माझ्या आत संपूर्णपणे व्यक्त झालेले आहेत. माझ्या आत प्रकट झालेले 'दादा भगवान' यांना मी पण नमस्कार करतो.''

व्यापारात धर्म असावा परंतु धर्मात व्यापार नसावा. या सिद्धांताने त्यांनी आपले संपूर्ण जीवन व्यतीत केले. साऱ्या जीवनात त्यांनी कधीही कोणाकडूनही पैसे घेतले नाहीत. उलट स्वत:च्या व्यवसायातून झालेल्या फायद्यातून भक्तांना यात्रा करवित असत.

# अक्रम विज्ञान
# आत्मसाक्षात्कार
# प्राप्तीचे सरळ आणि अचूक विज्ञान

## १. मनुष्य जीवनाचे ध्येय काय?

हे तर संपूर्ण जीवनच फ्रॅकचर झाले आहे. कशासाठी जगत आहोत याचे सुद्धा भान नाही. ध्येय नसलेले जीवन याला काही अर्थच नाही. पैसे येतात आणि खाऊन पिऊन मजा करायची आणि दिवसभर चिंता काळजी करत रहायची याला जीवनाचे ध्येय कसे म्हणता येईल? दुर्मिळ मनुष्य जन्म आहे तो असा वाया घालविण्यात काय अर्थ आहे? तर मग मनुष्य जन्म प्राप्त झाल्यानंतर स्वत:च्या ध्येयापर्यंत पोहोचण्यासाठी काय करायला हवे? संसारिक सुख, भौतिक सुख हवे असेल तर तुमच्याजवळ जे काही असेल ते लोकांमध्ये वाटत रहा.

या जगाचा नियम एकाच वाक्यात समजून घ्या, या जगातील सर्व धर्मांचा सार हाच आहे की जर तुम्हाला सुख हवे असेल तर इतर जीवांना सुख द्या आणि दु:खं हवे असेल तर दु:खं द्या. तुम्हाला जे अनुकूल असेल ते द्या. आता कोणी म्हणेल की आम्ही इतरांना सुख कसे द्यायचे, आमच्या जवळ पैसे तर नाही. तेव्हा फक्त पैश्यांनीच सुख देता येते असे थोडेच आहे, तर त्यांच्या प्रति तुम्ही ऑब्लाइजिंग नेचर (परोपकारी स्वभाव) ठेवू शकता, त्याला काही आणायचे असेल तर आणून देऊ शकता. त्याला चांगला सल्ला देऊ शकता. असे पुष्कळ मार्ग आहेत ऑब्लाइज करण्यासाठी.

## दोन प्रकारचे ध्येय, संसारिक आणि आत्यंतिक

दोन प्रकारचे ध्येय निश्चित केले पाहिजेत. आपण संसारात असे जगावे की आपल्यामुळे कोणालाही त्रास होऊ नये, कोणासही दु:खं होऊ नये. अशा प्रकारे आपण उत्तम सत्संगी पुरुष, खऱ्या पुरुषांच्या सहवासात राहावे, आणि कुसंगामध्ये पडू नये, असे काही ध्येय असायला हवे. आणि दुसऱ्या प्रकारच्या ध्येयामध्ये प्रत्यक्ष ज्ञानी पुरुष भेटले तर (त्यांच्याकडून आत्मज्ञान प्राप्त करून) त्यांच्या सत्संगात राहावे, त्यामुळे तुमची सर्व कामे होतील, सर्व कोडी सोडवली जातील. (आणि मोक्ष प्राप्त होईल.)

म्हणजे मनुष्याचे अंतिम ध्येय काय असावे? मोक्षाला जाण्याचेच! हेच ध्येय असायला हवे. तुम्हालाही मोक्षाला जायचे आहे ना? कुठपर्यंत भटकायचे? अनंत जन्मांपासून भटक-भटक... भटकण्यात काहीच बाकी ठेवले नाही ना! कशामुळे भटकणे झाले? कारण 'मी कोण आहे' हेच जाणले नाही. स्वत:चे स्वरूपच ओळखले नाही. स्वत:चे स्वरूप ओळखले पाहिजे. 'स्वत: कोण आहे' याची ओळख करायला नको का? इतके फिरून सुद्धा तुम्ही ओळखले नाही? केवळ पैसे कमावण्याच्या मागे पडलात? मोक्षासाठी पण थोडेफार काही करायला हवे की नाही? वास्तवात मनुष्य परमात्मा बनू शकतो, स्वत:चे परमात्मपद प्राप्त करणे हेच अंतिम ध्येय आहे.

## मोक्ष, दोन टप्प्यात

**प्रश्नकर्ता :** सामान्यपणे मोक्षचा अर्थ आम्ही जन्म-मरणापासून मुक्ती असा करतो.

**दादाश्री :** हो, हे बरोबर आहे. पण जी अंतिम मुक्ति आहे, ती सेकन्डरी स्टेज (दुसरा टप्पा) आहे. प्रथम मोक्ष म्हणजे संसारी दु:खांचा अभाव. संसारातील दु:खात पण दु:खं वाटत नाही, उपाधिमध्ये पण समाधी राहते, हा पहिला मोक्ष आणि मग हा देह सुटल्यानंतर आत्यंतिक मोक्ष

आहे. पण पहिला मोक्ष इथेच झाला पाहिजे. माझा मोक्ष झालाच आहे ना! संसारात राहून संसार स्पर्शत नाही, असा मोक्ष व्हायला पाहिजे. या अक्रम विज्ञानामुळे असे होऊ शकते.

## २. आत्मज्ञानामुळे शाश्वत सुखाची प्राप्ती

प्रत्येक जीव काय शोधतो? आनंद शोधत आहे, परंतु क्षणभरही आनंद मिळत नाही. विवाह प्रसंगात गेलात किंवा नाटक बघायला गेलात परंतु परत दुःखं हे येतेच. ज्या सुखानंतर दुःखं येते त्यास सुख कसे म्हणावे? तो तर मूर्छितपणाचा आनंद म्हटला जाईल. सुख तर परमेनन्ट (कायमचे) असते. हे तर टेम्पररी (तात्पुरते) सुख आहे आणि ते सुद्धा काल्पनिक आहे, मानलेले आहे. प्रत्येक आत्मा काय शोधतो? नेहमीसाठी सुख, शाश्वत सुख शोधत असतो. ते 'ह्याच्यातून सुख मिळेल, त्याच्यातून मिळेल, गाडी घेतली तर सुख मिळेल.' असे करत राहतो पण तरीही सुख काही मिळत नाही. उलट अधिकाधिक झंझटीमध्ये गुंतला जातो. सुख स्वतःच्या आतच आहे, आत्म्यातच आहे. म्हणूनच आत्मा प्राप्त केला तर (सनातन) सुख प्राप्त होईल.

## सुख आणि दुःखं

जगात सर्वच सुख शोधतात पण सुखाची व्याख्या निश्चित करत नाहीत. सुख असे असले पाहिजे की त्या सुखानंतर पुन्हा कधीही दुःखं येणार नाही. असे एक तरीही सुख या जगात असेल तर शोधून काढ, जा. शाश्वत सुख तर स्वतःच्या आत-स्वमध्येच आहे. स्वतःच अनंत सुखाचे धाम आहे आणि तरी नाशवंत वस्तूंमध्ये लोक सुख शोधायला निघाले आहे!

## सनातन सुखाचा शोध

ज्याला सनातन सुख प्राप्त झाले, आणि त्यानंतर जर त्याला संसारिक

सुखाचा स्पर्श झाला नाही तर त्या आत्म्याची मुक्ती झाली. सनातन सुख हाच मोक्ष आहे. दुसऱ्या कोणत्याही मोक्षाचे आम्हाला काय करायचे आहे? आम्हाला सुख हवे आहे. तुम्हाला सुख आवडते की नाही आवडत? ते मला सांगा.

**प्रश्नकर्ता :** त्यासाठीच तर धडपडत आहोत.

**दादाश्री :** हो, पण ते सुख तात्पुरते असेल तर चालत नाही. त्या सुखानंतर परत दुःखं येते, म्हणून ते आवडत नाही, सनातन सुख असेल तर पुन्हा कधी दुःखं येणार नाही, असे सुख पाहिजे. जर असे सुख मिळाले तर तोच मोक्ष आहे. मोक्ष म्हणजे काय? तर संसारी दुःखांचा अभाव तोच मोक्ष! नाहीतर दुःखांचा अभाव होत नाही, कोणालाही नाही!

एकतर, या बाहेरच्या विज्ञानाचा अभ्यास, ते तर जगातील वैज्ञानिक करतच असतात ना! आणि दुसरे, हे अंतर विज्ञान म्हटले जाते की, जे स्वतःला सनातन सुखाकडे घेऊन जाते. म्हणजे स्वतःच्या सनातन सुखाची प्राप्ती करवून देते, त्यास आत्मविज्ञान म्हटले जाते. आणि हे जे टेम्परररी एडजस्टमेन्टवाले सुख देते ते सर्व बाह्यविज्ञान म्हटले जाते. बाह्यविज्ञान तर शेवटी विनाशी आहे व विनाश करणारा आहे आणि हे अक्रम विज्ञान सनातन आहे आणि सनातन करणारा आहे!

# 3. I & My are separate

## ( मी आणि माझे वेगळे आहेत. )

### 'ज्ञानी' च मौलिक स्पष्टीकरण देतात.

'I' (मी) हे भगवंत आहे आणि 'My' (माझे) ही माया आहे. 'My' is Relative to 'I'. 'I' is real आत्म्याच्या गुणांचा 'I' मध्ये आरोपण केले तरी 'तुमची' शक्ती खूपच वाढेल. मूळ आत्मा ज्ञानीशिवाय

मिळू शकत नाही, परंतु हे 'I' आणि 'My' अगदी वेगळेच आहेत. असे जर सर्वानांच, परदेशी लोकांनाही जर समजले तर त्यांचे दु:खं फार कमी होईल, हे विज्ञान आहे. अक्रम विज्ञानाच्या या आध्यात्मिक रिसर्चची ही अगदी नवीनच पद्धत आहे. 'I' हा स्वायत्त भाव आहे. आणि My मालकीभाव आहे.

## सेपरेट I एन्ड My

तुम्हाला सांगितले की, सेपरेट 'I' and 'My' विथ सेपरेटर, तर आपण 'I' आणि 'My' ला सेपरेट (वेगळे) करू शकणार का? 'I' आणि 'My' ला सेपरेट करायला हवे की नाही? आणि हे कधी ना कधी तर जाणावेच लागेल ना. सेपरेट 'I' आणि 'My' जसे दुधासाठी सेपरेटर असते ना, त्यातून मलई वेगळी करतात ना? असेच हे वेगळे करायचे आहे.

तुमच्या जवळ 'My' सारखी कुठली गोष्ट आहे? 'I' एकाटाच आहे की 'My' सोबत आहे?

**प्रश्नकर्ता :** 'My' सोबत असणारच ना.

**दादाश्री :** कोणकोणते 'My' आहे आपल्याजवळ?

**प्रश्नकर्ता :** माझे घर आणि घरातील सगळया वस्तू.

**दादाश्री :** सर्व आपली म्हणणार? आणि पत्नी कोणाची म्हणणार?

**प्रश्नकर्ता :** ती पण माझी.

**दादाश्री :** आणि मुले कोणाची?

**प्रश्नकर्ता :** ती पण माझी.

**दादाश्री :** आणि हे घडयाळ कोणाचे?

**प्रश्नकर्ता :** ते पण माझे.

**दादाश्री :** आणि हे हात कोणाचे?

**प्रश्नकर्ता :** हात पण माझेच आहेत.

**दादाश्री :** मग माझे डोके, माझे शरीर, माझे पाय, माझे कान, माझे डोळे असे सांगाल. या शरीराच्या सगळ्या वस्तूंना माझे म्हणतात, तेव्हा माझे म्हणणारे 'आपण' कोण आहात? याचा विचार नाही केला? 'My' नेम इज़ 'चंदुलाल' म्हणणार आणि मग बोलणार 'मी चंदुलाल आहे.' यात विरोधाभास नाही वाटत? (चंदुलालच्या जागी वाचकांनी स्वतःचे नाव समजायचे)

**प्रश्नकर्ता :** वाटत आहे.

**दादाश्री :** तुम्ही चंदुलाल आहात, पण याच्यात 'I' आणि 'My' दोन आहेत. हे 'I' आणि 'My' चे दोन रेल्वे लाइन वेगळ्याच असतात. पॅरेललच (समांतर) असतात, कधीही एकत्र येत नाहीत. तरीपण आपण एकत्र मानता, याला समजून यातून 'My' ला सेपरेट करा. आपल्यात जो 'My' आहे त्याला एका बाजूला ठेवा. 'My' हार्ट, तर त्याला एका बाजुला ठेवा. या शरीरातून अजून काय काय सेपरेट करावे लागेल?

**प्रश्नकर्ता :** पाच इन्द्रिये.

**दादाश्री :** हो, सर्वच. पाच इन्द्रिये, पाच कर्मेन्द्रिये. आणि मग 'माय माईंड' म्हणतात की 'आय एम माईंड' म्हणतात?

**प्रश्नकर्ता :** 'माय माईंड' (माझे मन) म्हणतात.

**दादाश्री :** माझी बुद्धी म्हणतात ना?

**प्रश्नकर्ता :** हो.

**दादाश्री :** माझे चित्त म्हणतात ना?

**प्रश्नकर्ता :** हो.

**दादाश्री :** आणि 'माय इगोइझम' बोलतात की 'आय एम ईगोइझम' बोलतात?

**प्रश्नकर्ता :** 'माय इगोइझम' (माझा अहंकार).

**दादाश्री :** 'माय इगोइझम' म्हणाल तर त्याला वेगळे करू शकाल. पण त्याच्या पुढे जे आहे, त्याच्यात तुमचा हिस्सा काय आहे, हे तुम्ही जाणत नाही. म्हणून मग पूर्णपणे सेपरेशन नाही होऊ शकत. तुम्ही तुमचे काही मर्यादेपर्यंतच जाणू शकता. तुम्ही स्थूल वस्तूच जाणता, सूक्ष्मची ओळखच नाही. सूक्ष्मला वेगळे करणे, नंतर सूक्ष्मतर वेगळे करणे, नंतर सूक्ष्मतम वेगळे करणे हे तर ज्ञानी पुरुषांचे च काम आहे.

पण एक एक करत सगळे स्पेरपार्टस वेगळे करत गेले तर 'I' आणि 'My' दोन्ही वेगळे होऊ शकतात ना? 'I'आणि 'My' दोन्ही वेगळे केल्यानंतर शेवटी काय उरणार? 'My' ला एका बाजुला ठेवले तर शेवटी काय उरणार?

**प्रश्नकर्ता :** 'I' (मी).

**दादाश्री :** हो 'I' तेच आपण आहात. बस, या 'I' लाच रियलाईझ करायचे आहे.

तिथे आमची (ज्ञानींची) आवश्यकता असते. मी तुम्हाला हे सर्व वेगळे करून देईल. त्यानंतर तुम्हाला मी शुद्धात्मा आहे याचा अनुभव येईल. अनुभव आला पाहिजे. आणि त्याचबरोबर दिव्यचक्षु सुद्धा देतो ज्यामुळे आत्मवत सर्व भूतेषु, (सर्वांमध्ये आत्मा) दिसेल.

## ४. 'मी' ची ओळख कशी?

### जप-तप, व्रत व नियम

**प्रश्नकर्ता :** व्रत,तप, नियम हे सर्व आवश्यक आहे की नाही?

**दादाश्री :** त्याचे असे आहे, की औषधच्या दुकानात जितक्या

औषधी असतात, त्या सर्व आवश्यक असतात पण ते इतर लोकांसाठी, तुम्हाला तर ज्या औषधाची आवश्यकता आहे तेच औषध घ्यायचे असते. त्याचप्रमाणे व्रत, तप, नियम या सर्वांची आवश्यकता आहे. या जगात काहीच चुकीचे नाही पण हे प्रत्येकाच्या दृष्टीने प्रत्येकाच्या अपेक्षेने सत्य आहे.

**प्रश्नकर्ता :** तप आणि क्रियेमुळे मुक्ती मिळते का?

**दादाश्री :** तप आणि क्रियेने फळ मिळते मुक्ती मिळत नाही. कडूलिंबाचे झाड लावले तर कडू फळे मिळतील आणि आंब्याचे झाड लावले तर गोड फळे मिळतील. तुला जसे फळ हवे असेल तसे बी पेर. मोक्षप्राप्तीचे तप तर वेगळेच असते, ते अंतरतप असते. लोक बाहेरील तपांना तप समजून बसले आहेत. जे तप बाहेरून दिसतात ते तप मोक्षासाठी उपयोगी पडणार नाहीत. त्या तपाचे फळ पुण्य आहे. मोक्षाला जाण्यासाठी अंतरतपाची आवश्यकता आहे, अदीठ तप हवे.

**प्रश्नकर्ता :** मंत्रजपाने मोक्ष मिळतो की ज्ञानमार्गाने मोक्ष मिळतो?

**दादाश्री :** मंत्रजपाने तुम्हाला संसारात शांती मिळते, मनाला शांत करतो ते मंत्र, त्यामुळे भौतिक सुख मिळतात आणि मोक्ष हा ज्ञानमार्गाशिवाय होऊ शकत नाही. अज्ञानामुळे बंधन आहे आणि ज्ञानामुळे मुक्ती आहे. या जगात जे ज्ञान चालत आहे ते इन्द्रियज्ञान आहे, ती भ्रांती आहे. अतीन्द्रिय ज्ञान हेच खरे ज्ञान आहे.

ज्याला स्वतःच्या स्वरूपाची ओळख करून मोक्ष प्राप्त करायचा आहे, त्याला क्रियेची गरज नाही, भौतिक सुखांची कामना आहे, त्यांना क्रियेची गरज आहे. मोक्षास जायचे असेल त्यांना तर ज्ञान आणि ज्ञानीची आज्ञा, या दोनच गोष्टींची गरज आहे.

## ज्ञानीच ओळख करून देतात 'मी' ची

**प्रश्नकर्ता :** आपण म्हणालात की तुम्ही स्वतःला ओळखा, तर स्वतःला ओळखण्यासाठी आम्ही काय करावे?

**दादाश्री :** त्यासाठी तर माझ्याकडे या. मला सांगा की आम्हाला स्वत:ची ओळख करून घ्यायची आहे, तेव्हा मी तुम्हाला तुमची ओळख करून देईल.

**प्रश्नकर्ता :** 'मी कोण आहे' हे जाणून घेण्याची जी गोष्ट आहे, ती या संसारात राहून कशी शक्य होऊ शकते?

**दादाश्री :** तर कुठे राहून जाणू शकतो त्यास? संसाराशिवाय आणखी कुठली जागा आहे जेथे राहू शकतो? या जगात सर्व संसारीच आहेत आणि सर्व संसारातच राहतात. इथे 'मी कोण आहे' हे जाणण्यास मिळेल असे आहे. 'आपण कोण आहात' हेच विज्ञान समजायचे आहे इथे. इकडे या, आम्ही आपल्याला ओळख करून देऊ.

## मोक्षासाठी सोपा-सरळ उपाय

जे मुक्त झालेले आहेत त्यांच्याकडे जाऊन आपण त्यांना सांगावे की साहेब, माझी मुक्ती करून द्या! हाच अंतिम उपाय. सर्वात चांगला उपाय. 'स्वतः कोण आहे' हे नक्की झाल्यावर त्याला मोक्षगती मिळेल आणि जोपर्यंत आत्मज्ञानींशी भेट होत नाही तोपर्यंत आत्मज्ञानींची पुस्तके वाचली पाहिजेत.

आत्मा वैज्ञानिक वस्तू आहे. पुस्तकातून प्राप्त होईल अशी वस्तू नाही. आत्मा स्वत:च्या गुणधर्मासहित आहे, चेतन आहे आणि तोच परमात्मा आहे. त्याची ओळख झाली म्हणजे झाले, कल्याण झाले आणि ते तुम्ही स्वत:च आहात. मोक्षमार्गात तप-त्याग असे काहीही करावे लागत नाही. केवळ ज्ञानी पुरुष भेटले तर ज्ञानीची आज्ञा हाच धर्म आणि आज्ञा हेच तप. आणि हेच ज्ञान, दर्शन, चारित्र आणि तप आहे, ज्याचे प्रत्यक्ष फळ मोक्ष आहे.

ज्ञानी पुरुष भेटले तरच मोक्षाचा मार्ग सोपा आणि सरळ होऊन जातो, खिचडी बनविण्यापेक्षा सुद्धा सोपा होतो.

# ५. 'मी' ची ओळख-ज्ञानी पुरुषाकडून

## आवश्यकता गुरुची की ज्ञानीची?

**प्रश्नकर्ता :** दादाजींना भेटण्यापूर्वी कोणाला गुरु केले असेल तर अशा व्यक्तीनी काय करावे?

**दादाश्री :** त्यांच्याकडे जावे. आणि जर जायचे नसेल तर नका जाऊ, तसे हे आवश्यकही नाही. तुमची इच्छा असेल तर जा आणि नाही तर नका जाऊ. त्यांना दु:खं होऊ नये, म्हणून सुद्धा जायला हवे. तुम्ही विनय ठेवला पाहिजे. इथे 'आत्मज्ञान' घेते वेळी मला कोणी विचारेल की, 'आता मी गुरुंना सोडून देऊ?' तेव्हा मी सांगेन की 'नको सोडू, अरे, त्या गुरुंच्या प्रतापामुळे तर इथपर्यंत पोहचू शकलात.' संसाराचे ज्ञान पण गुरुशिवाय होत नाही आणि मोक्षाचे ज्ञान पण गुरुशिवाय होत नाही. व्यवहाराचे गुरु 'व्यवहारासाठी' आहेत आणि ज्ञानी पुरुष 'निश्चय' साठी आहे. व्यवहार रिलेटिव्ह आहे आणि निश्चय रियल आहे. रिलेटिव्हसाठी गुरु हवेत आणि रियलसाठी ज्ञानी पुरुष हवेत.

**प्रश्नकर्ता :** असे सुद्धा म्हणतात ना की गुरुशिवाय ज्ञान मिळत नाही.

**दादाश्री :** गुरु तर रस्ता दाखवतात, ते मार्ग दाखवतात आणि 'ज्ञानी पुरुष' ज्ञान देतात. ज्ञानी पुरुष म्हणजे जे सर्वच जाणतात, त्यांना जाणण्यासाठी काहीच बाकी राहिले नाही. स्वत: तद्स्वरूपात बसले आहेत, म्हणूनच, 'ज्ञानी पुरुष' तुम्हाला सर्व काही देतात आणि गुरु तर संसारात तुम्हाला मार्ग दाखवतात. त्यांनी सांगितल्या प्रमाणे केले तर संसारात सुखी होता येते. आणि जे आधि, व्याधी, आणि उपाधीमध्ये सुद्धा समाधी अवस्थेत ठेवतात ते 'ज्ञानी पुरुष.'

**प्रश्नकर्ता :** गुरु द्वारा ज्ञान प्राप्त होते परंतु ज्या गुरुंना आत्मसाक्षात्कार झाला आहे त्यांच्याकडूनच ज्ञान प्राप्त होते ना?

**दादाश्री :** ते 'ज्ञानीपुरुष' असले पाहिजेत आणि ते सुद्धा केवळ

आत्मसाक्षात्कार घडवून दिल्याने काही होत नाही. 'ज्ञानी पुरुष' तर, हे जग कसे चालत आहे? स्वत: कोण आहे? हे कोण आहे? असे सर्व स्पष्टीकरण देतील तेव्हाच कार्य पूर्ण होईल असे आहे. पण जर पुस्तकातच गुंतून राहिलात तर पुस्तके तर 'मदतनीस' आहेत. ते साधारण कारण आहे असाधारण (मुख्य) कारण नाही. असाधारण कारण कोणते आहे? ते म्हणजे 'ज्ञानी पुरुष!'

## अर्पण विधी कोण करवू शकतो?

**प्रश्नकर्ता :** हे ज्ञान घेण्या अगोदर अर्पण विधी करवून घेतात ना, तर समजा या पूर्वी दुसऱ्या कोणा गुरु समक्ष अर्पणविधी केली असेल आणि येथे पुन्हा अर्पण विधी केली तर ते योग्य ठरणार नाही ना?

**दादाश्री :** गुरु अर्पणविधी करवून घेतच नाहीत. येथे आपण काय काय अर्पण करायचे? आत्म्याशिवाय इतर सर्वकाही. म्हणजे सर्वकाही अर्पण तर कोणी करतच नाही ना! अर्पण होतही नाही आणि कोणी गुरु तसे सांगतही नाही. ते तर तुम्हाला मार्ग दाखवितात. ते मार्गदर्शका च्या रूपाने काम करतात. आम्ही गुरु नाही, आम्ही तर ज्ञानी पुरुष आहोत आणि हे तर भगवंताचे दर्शन करायचे आहे. आम्हाला अर्पण करायचे नाही, भगवंताला अर्पण करायचे आहे.

## आत्मानुभूती कशाप्रकारे होत असते?

**प्रश्नकर्ता :** 'मी आत्मा आहे' हे ज्ञान कशा प्रकारे होते? काय केले तर स्वत: अनुभूती करू शकेल?

**दादाश्री :** ती अनुभूती करविण्यासाठी तर 'आम्ही' (ज्ञानी) येथे बसलेलो आहोत. आम्ही जेव्हा ज्ञान देतो तेव्हा 'आत्मा' आणि 'अनात्मा' यांना वेगळे करून देतो आणि मग तुम्हाला घरी पाठवतो.

ज्ञानप्राप्ती आपणहून होत नाही. जर आपणहून झाली असती तर

सर्व साधू, संन्यासी प्राप्त करून बसले असते. परंतु ते तर ज्ञानी पुरुषांचे काम आहे. 'ज्ञानी पुरुष' त्याचे निमित्त आहेत.

जसे औषधासाठी डॉक्टरांची गरज आहे की नाही? की मग तुम्ही स्वत:च घरी औषध बनवून घेता? तेथे कसे जागृत राहता की काही चूक झाली तर मरून जाऊ! आणि आत्म्यासंबंधी स्वत:च 'मिक्श्चर' बनवून घेता. शास्त्रे गुरुकडून समजून घेण्याऐवजी स्वत:च्या बुद्धीने वाचली आणि मिक्श्चर बनवून पिऊन टाकले. याला भगवंतानी स्वच्छंद म्हटले आहे. या स्वच्छंदामुळे तर अनंतजन्माचे मरण झाले! तो तर एकच जन्माचा मृत्यू होता.

## अक्रम ज्ञानामुळे रोख मोक्ष

सध्या ज्ञानी पुरुष प्रत्यक्ष हजर आहेत म्हणून मार्ग सुद्धा मिळेल, नाहीतर लोक सुद्धा पुष्कळ विचार करतात, परंतु त्यांना मार्ग सापडत नाही व चुकीच्या मार्गाने चालत राहतात. 'ज्ञानी पुरुष' तर कधीकाळी एखादेच प्रकट होतात, आणि त्यांच्याकडून ज्ञान मिळते व आत्मानुभव होतो. मोक्ष तर येथेच रोख मिळायला हवा. येथेच देहासहित मोक्ष अनुभवास आला पाहिजे. या अक्रमज्ञानामुळे रोकड मोक्षही मिळतो आणि अनुभव सुद्धा येतो, असे आहे!

## ज्ञानीच करवितात आत्मा-अनात्माचा भेद

जसे या अंगठीत सोने आणि तांबे दोन्ही मिसळलेले आहेत. ही अंगठी आपण गावात घेऊन जाऊन कोणाला सांगितले की, 'भाऊ, यातील सोने आणि तांबे वेगळे करून द्या ना!' तर काय कोणीही करून देइल? कोण करू शकेल?

**प्रश्नकर्ता :** सोनारच करू शकेल.

**दादाश्री :** ज्याचे हे काम आहे, जो यात एक्सपर्ट आहे, तो सोने आणि तांबे दोन्ही वेगळे करेल. शुद्ध शंभर नंबरी सोने वेगळे करेल,

कारण तो दोन्हींचे गुणधर्म जाणतो, की सोन्याचे गुणधर्म असे आहेत आणि तांब्याचे गुणधर्म असे आहेत. तसेच ज्ञानी पुरुष आत्म्याचे गुणधर्म जाणतात आणि अनात्माचे गुणधर्म पण जाणतात.

जसे अंगठीमध्ये सोने आणि तांबे मिश्रण स्वरूपात असेल तर त्याला वेगळे करता येते. पण जर सोने आणि तांबे दोन्ही कम्पाउन्ड स्वरूप झालेले असेल तर त्यांना वेगळे करता येत नाही, कारण यामुळे गुणधर्म वेगळ्याच प्रकारचे होऊन जातात. अशाप्रकारे जीवाच्या आत चेतन आणि अचेतनचे मिश्रण आहे, ते कम्पाउन्ड स्वरूप नाही. म्हणूनच पुन्हा स्वत:च्या स्वभावाला प्राप्त करू शकता. कम्पाउन्ड झाले असते तर कळलेच नसते. चेतनचे गुणधर्म पण कळले नसते आणि अचेतनचे गुणधर्म पण कळले नसते आणि तिसरेच गुणधर्म उत्पन्न झाले असते. पण असे घडलले नाही. हे केवळ मिश्रण झाले आहे.

## ज्ञानी पुरुष जगातील ग्रेटेस्ट सायंटिस्ट

ज्ञानी पुरुष हेच जगातील ग्रेटेस्ट सायंटिस्ट (सर्वश्रेष्ठ शास्त्रज्ञ) आहेत तेच जाणत असतात आणि तेच आत्मा-अनात्माचे विभाजन करू शकतात. एवढेच नाही, तर तुमच्या पापांना जाळून भस्मिभूत (राख) करू शकतात, व दिव्यचक्षु देतात आणि हे जग काय आहे? कसे चालत आहे? कोण चालवित आहे? इत्यादी सर्व स्पष्ट करून सांगू शकतात. तेव्हाच आपले काम पूर्ण होते.

करोडो जन्मांची पुण्याई उदयास येते तेव्हा ज्ञानीचे दर्शन घडू शकते. नाहीतर दर्शन कुठून होणार? ज्ञान प्राप्त करण्यासाठी 'ज्ञानी' ला ओळख, त्याशिवाय दुसरा कुठलाही मार्ग नाही. आणि शोधणाऱ्यांना ते भेटतातच.

# ६. ज्ञानी पुरुष कोण?

## संत आणि ज्ञानीची व्याख्या

**प्रश्नकर्ता :** हे जे सर्व संत होऊन गेलेत त्यांच्यात आणि ज्ञानी यांच्यामध्ये काय फरक आहे?

**दादाश्री :** जे तुमच्यातल्या उणीवा दूर करतात आणि चांगल्या गोष्टी शिकवतात. जे वाईट गोष्टी सोडवतात आणि चांगल्या गोष्टी करण्यास शिकवतात, ते संत म्हटले जातात. पापकर्मांपासून वाचवतात से संत आहेत. परंतु जे पाप आणि पुण्य दोन्हीपासून वाचवतात ते ज्ञानी पुरुष. संत पुरुष खऱ्या मार्गावर आणतात आणि ज्ञानी पुरुष मुक्ती मिळवून देतात. ज्ञानी पुरुष तर अंतिम विशेषण म्हटले जातात ते तर आपले (मोक्षाचे) काम सिद्ध करून देतात. खरे ज्ञानी कोण? की ज्यांच्यात अहंकार आणि ममता हे दोन्हीही नाही. ज्यांना आत्म्याचा पूर्ण अनुभव आला आहे ते ज्ञानी पुरुष. ते संपूर्ण ब्रह्मांडाचे वर्णन करू शकतात. सगळ्या प्रश्नांची उत्तरे देऊ शकतात. ज्ञानी पुरुष म्हणजे जगातील एक अदभूत आश्चर्य. ज्ञानी पुरुष म्हणजे प्रकट दिवा.

## ज्ञानी पुरुषांची ओळख

**प्रश्नकर्ता :** ज्ञानी पुरुषाला कसे ओळखावे?

**दादाश्री :** ज्ञानी पुरुष तर काही न करताच ओळखले जातील असे असतात. त्यांचा सुगंधच, ओळखला जाईल असा असतो. त्यांचे वातावरण काही वेगळेच असते. त्यांची वाणी सुद्धा वेगळीच असते. त्यांच्या शब्दांवरूनच कळते. अरे, त्यांचे डोळे बघताच जाणीव होते, ज्ञानीकडे खूप विश्वसनियता असते, जबरदस्त विश्वसनियता. आणि त्यांचा प्रत्येक शब्द शास्त्ररूप असतो, जर समजले तर! त्यांची वाणी-वर्तन आणि विनय मनोहर असतात, मनाचे हरण करणारे असतात. अशी बरीच लक्षणे असतात.

ज्ञानी पुरुष अबुध असतात. कधीकाळी त्यांचा जन्म होत असतो आणि तेव्हा लोकांचे कल्याण होऊन जाते. तेव्हा लाखो मनुष्य (संसारसागर) पार होऊन जातात. जे आत्म्याचे ज्ञानी असतात ते परम सुखी असतात, त्यांना किंचीतमात्र दु:खं नसतेच. म्हणून तेथे आपले कल्याण होत असते. ज्यांनी स्वत:चे कल्याण केलेले आहे तेच आपले

कल्याण करू शकतात. जे संसारसागर पार उतरले तेच आपल्यालाही पार करू शकतात. तेथे लाखो माणस संसारसागर पार करू शकतात.

श्रीमद राजचंद्रांनी काय म्हटले आहे की 'ज्ञानी पुरुष' कोण? ज्यांना किंचित मात्र, कुठल्याही प्रकारची स्पृहा नाही, जगातील कुठल्याही प्रकारची भिक नाही, उपदेश देण्याची सुद्धा ज्यांना भिक नाही, शिष्यांचीही भिक नाही, कोणाला सुधारण्याची भिक नाही, कुठलाही गर्व नाही, गारवता नाही, मालकी भाव नाही तेच ज्ञानी पुरुष.

## ७. ज्ञानी पुरुष-ए.एम.पटेल ( दादाश्री )

**दादाश्री :** 'दादा भगवान,' चौदालोकाचे नाथ आहेत. ते तुमच्यातही आहेत, पण तुमच्यात प्रकट झालेले नाहीत. तुमच्यात अव्यक्त रूपात आहेत आणि इथे व्यक्त झालेले आहे, व्यक्त झाले ते फळ देतात. एकदा जरी त्यांचे नाव घेतले तरी काम होऊन जाईल असे आहे. परंतु ओळखून बोललो तर कल्याण होईल आणि सांसारिक गोष्टींची काही अडचण असेल तर ती देखिल दूर होईल.

हे दिसत आहे ते 'दादा भगवान' नाहीत., हे जे दिसतात, त्यांना तुम्ही 'दादा भगवान' समजत असाल ना? पण हे दिसणारे तर भादरणचे पटेल आहेत. मी 'ज्ञानी पुरुष' आहे आणि आत प्रकट झालेत ते दादा भगवान आहेत. मी स्वत:भगवान नाही. माझ्यात प्रकट झालेल्या दादा भगवानांना मी सुद्धा नमस्कार करतो. दादा भगवानांसोबत आमचा वेगळेपणाचाच (भिन्नतेचा) व्यवहार आहे. परंतु लोक असे समजतात की हे स्वत:च दादा भगवान आहेत. नाही, स्वत: दादा भगवान कसे असू शकतील? हे तर पटेल आहेत, भादरण गावचे.

(हे ज्ञान घेतल्यानंतर) दादाजींच्या आज्ञेचे पालन करणे म्हणजे ए.एम.पटेल यांची आज्ञा नाही. स्वत: दादा भगवान जे चौदालोकाचे नाथ आहेत, त्यांची आज्ञा आहे याची गॅरंटी मी देतो. हे तर माझ्या माध्यमातून

या सर्व गोष्टी निघाल्या आहेत एवढेच, म्हणून तुम्ही या आज्ञेचे पालन करा. माझी आज्ञा नाही, दादा भगवानांची आज्ञा आहे. मी सुद्धा त्यांच्या आज्ञेतच राहतो ना!

## ८. क्रमिक मार्ग- अक्रम मार्ग

मोक्षाला जाण्याचे दोन मार्गः एक 'क्रमिक' मार्ग आणि दुसरा 'अक्रम' मार्ग. क्रमिक म्हणजे पायरी पायरीने वर चढणे. जसे जसे तुम्ही परिग्रह कमी करत जाल, तसे तुम्ही मोक्षापर्यंत पोहोचणार. ते सुद्धा बऱ्याच काळानंतर, आणि हे अक्रम विज्ञान म्हणजे काय? पायऱ्या चढायच्या नाही. लिफ्टमध्ये बसायचे आणि थेट बाराव्या मजल्यावर पोहोचायचे, असा हा लिफ्टचा मार्ग निघाला आहे. सरळच लिफ्टमध्ये बसून, बायको मुलांसोबत आणि मुला-मुलींचे लग्न करवून, सर्व काही करून मोक्षाला जायचे. हे सर्व करून सुद्धा तुमचा मोक्ष हरवणार नाही. असा हा अक्रममार्ग, अपवाद मार्ग सुद्धा म्हटला जातो. तो दर दहा लाख वर्षानंतर प्रकट होत असतो. तेव्हा जे या लिफ्टमार्गात बसलेत त्यांचे तर कल्याण झाले. मी तर निमित्त आहे. जे ह्या लिफ्टमध्ये बसले त्यांचे प्रश्न तर सुटलेच ना! उपाय तर करावा लागेल. आम्ही मोक्षाला जाणारच आहोत पण त्या लिफ्टमध्ये बसल्याची खात्री-पुरावे सुद्धा असायला हवे की नाही? त्याची खात्री म्हणजे क्रोध, मान, माया, लोभ होत नाही. आर्तध्यान-रौद्रध्यान होत नाही, म्हणजे मग काम फत्ते झाले ना.

## अक्रम करवितो सरळतेने आत्मानुभूती

क्रमिक मार्गात अत्याधिक प्रयत्न केल्यानंतर आत्मा आहे असे जाणवते, ते सुद्धा अगदी अस्पष्ट आणि लक्ष तर राहतच नाही. तेथे त्यांना लक्ष ठेवावे लागते की आत्मा असा आहे आणि अक्रम मार्गात तर तुम्हाला सरळ आत्मानुभवच होऊन जातो. डोके दुखो, भूक लागो, बाहेर भले कितीही अडचणी येवोत पण आतील *शाता* (सुख परिणाम)

काही जात नाही यास आत्मानुभव म्हटले आहे. आत्मानुभव हा दु:खाला सुद्धा सुखात बदलवितो. आणि मिथ्यात्वीला तर सुखात सुद्धा दु:खं भासत असते.

हे अक्रम विज्ञान आहे म्हणूनच इतक्या लवकर समकित होत असते. हे तर अति उच्च प्रकारचे विज्ञान आहे. आम्ही आत्मा आणि अनात्मामध्ये म्हणजे आपली आणि परकी वस्तू याचे विभाजन करून देतो. हे एवढे तुमचे आणि हे तुमचे नाही. दोन्हीमध्ये फक्त विधीन वन अवर लाईन ऑफ डिमार्केशन (एका तासातच भेदरेषा) आखून देतो. तुम्ही स्वत: जरी कितीही मेहनत केली, तरी लाखो जन्मानंतर सुद्धा हे शक्य होणार नाही.

## 'मला' भेटला तोच अधिकारी

**प्रश्नकर्ता :** हा मार्ग इतका सोपा आहे, तर मग अधिकार, (पात्रता) असे काहीच पाहायचे नाही? प्रत्येकांसाठी हे संभव आहे का?

**दादाश्री :** लोक मला विचारतात की, 'मी अधिकारी आहे का?' तेव्हा मी सांगितले, 'मला भेटला, म्हणून तू अधिकारी आहेस.' हे भेटणे म्हणजे त्या मागे सायन्टिफिक सरकमस्टेन्शियल एविडन्स आहे. म्हणजे मला जो कोणी भेटला, त्याला मी अधिकारी मानतो. हे कशाच्या आधारावर भेटतात? तर, अधिकारी आहेत या आधारावर ते मला भेटतात. मला भेटल्यानंतरही जर त्याला प्राप्ती होत नाही, तर त्याचे अंतराय कर्म त्याल बाधक आहेत.

## क्रमात करायचे आणि अक्रमात.....

एकदा, एका भाऊ ने प्रश्न केला की क्रम आणि अक्रममध्ये फरक काय आहे? तेव्हा मी सांगितले की, क्रम म्हणजे, जसे की सगळे सांगतात की हे उलटे (चुकीचे) सोडा आणि सुलट (चांगले) करा. नेहमी सर्वांनी

हेच सांगितले, याचे नाव क्रमिक मार्ग. क्रम म्हणजे सर्व सोडायला सांगणे, कपट-लोभ सोडा आणि चांगले करा. हेच आपण पाहिले ना आजपर्यंत? आणि हे अक्रम म्हणजे, करायचे नाही, करोमि-करोसि-करोति नाही!

अक्रम विज्ञान तर फार मोठे आश्चर्य आहे, 'आत्मज्ञान' घेतल्यानंतर लगेच दुसऱ्या दिवसापासूनच मनुष्यात परिवर्तन होते. हे ऐकताच लोकं या विज्ञानाचा स्वीकार करतात व इथे आकर्षित होऊन येतात.

अक्रममध्ये मूळात आतूनच सुरुवात होते. क्रमिक मार्गात शुद्धता आतून होऊ शकत नाही. त्याचे कारण तशी केपेसिटी(क्षमता) नाही, अशी मशीनरी नाही म्हणून बाहेरची पद्धत अवलंबविली आहे, परंतु बाहेरची पद्धत आत केव्हा पोहोचणार? तर जेव्हा मन-वचन-कायेची एकता असेल तेव्हाच आत पोहोचणार आणि नंतर आत सुरुवात होईल. मूळात (सध्या) मन-वचन-कायेची एकताच राहिली नाही.

## एकात्मयोग तुटल्यामुळे अपवादरुपात प्रकटला अक्रम

जगाने स्टेप बाय स्टेप (पायरी पायरीने) क्रमशः पुढे जाण्याचा मार्ग शोधून काढला आहे पण तो मार्ग तोपर्यंतच योग्य होता की जोपर्यंत व्यक्ती मनात असेल तसेच वाणीने बोलत असेल आणि तसेत वर्तन करीत असेल. तोपर्यंत असा मोक्षमार्ग चालू शकतो. अन्यथा हा मार्ग बंद होऊन जातो. पण ह्या काळात मन-वचन-कायेची एकता तुटली आहे म्हणून क्रमिक मार्ग फ्रॅक्चर झाला आहे, येथे सर्व काही अलाऊ (स्वीकार) होत असते. तू जसा असशील तसा. तू मला येथे भेटला ना, तेव्हा बस! म्हणजे आपल्याला आणखी दुसरी काही झंझटच करायची नाही.

## ज्ञानी कृपेनेच प्राप्ती

**प्रश्नकर्ता :** तुम्ही हा जो अक्रम मार्ग सांगितला तो तुमच्यासारख्या

ज्ञानीसाठी ठीक आहे, सरळ-सोपा आहे पण आमच्यासारख्या सामान्य, संसारात राहणाऱ्या, काम करणाऱ्या, लोकांसाठी हे कठीण आहे. त्यावर काय उपाय आहे ?

**दादाश्री :** ज्ञानी पुरुषात भगवान प्रकट झालेले असतात, चौदालोकचे (ब्रह्मांडाचे) नाथ प्रकट झालेले असतात, असे ज्ञानी पुरुष लाभले मग काय बाकी राहील ? तुमच्या शक्तिने करायचे नाही, त्यांच्या कृपेनेच होणार आगे. कृपेमुळेच सर्व फेरफार होते. म्हणजे येथे तुम्ही जे मागाल ते सर्व हिशोब पूर्ण होतात. तुम्हाला काहीच करायचे नाही. तुम्हाला फक्त ज्ञानी पुरुषांच्या आज्ञेतच राहायचे. हे अक्रम विज्ञान आहे. म्हणून या प्रत्यक्ष भगवानांकडून काम साधून घ्यायचे आहे आणि ते तुम्हाला क्षणोक्षणी (हजर) राहते, एक दोन तास नाही पण सतत.

**प्रश्नकर्ता :** म्हणजे त्यांना सर्व सोपवल्यावर तेच सर्व काही करतात ?

**दादाश्री :** तेच सर्व काही करतील. तुम्हाला काहीच करायचे नाही, केल्याने तर कर्मबंधन होईल. तुम्हाला फक्त लिफ्टमध्ये बसायचे आणि पाच आज्ञा पाळायच्या. लिफ्टमध्ये बसल्यानंतर आत उड्या मारू नका. हात बाहेर काढू नका, एवढेच तुम्हाला करायचे आहे. कधीतरी असा मार्ग निघतो, तो पुण्यशाली लोकांसाठीच आहे, जगातले हे अकरावे आश्चर्य आहे ! अपवादात्मक ज्याला मिळाले त्याचे काम झाले.

## 'अक्रम मार्ग' चालूच आहे

यात माझा हेतू एवढाच आहे की मी जे सुख प्राप्त केले ते सुख तुम्ही सुद्धा प्राप्त करावे. म्हणजे असे जे हे विज्ञान प्रकट झाले आहे ते काही असेच दबून राहणार नाही. आम्ही आमच्या मागे ज्ञानींची वंशवेल सोडून जाऊ. आमचे उत्तराधिकारी सोडून जाऊ आणि त्याच्या नंतर ज्ञानीचीं लिंक चालू राहिल. म्हणून सजीवन मूर्ति शोधा, त्याशिवाय मार्ग निघणार नाही.

मी तर काही लोकांना आपल्या हाताने सिद्धि प्रदान करणार आहे. नंतर कोणी हवे की नको? नंतर लोकांना मार्ग तर हवा ना?

## ९. ज्ञानविधी काय आहे?

**प्रश्नकर्ता :** आपली ज्ञानविधी काय आहे?

**दादाश्री :** ज्ञानविधी तर पुद्‌गल (अनात्मा) आणि आत्म्याचे सेपरेशन करते. शुद्ध चेतन आणि पुद्‌गल दोन्हीचे सेपरेशन.

**प्रश्नकर्ता :** हा सिद्धांत तर बरोबर आहे, परंतु त्याची पद्धत काय आहे?

**दादाश्री :** याच्यात देणेघेणे काही होत नाही, केवळ इथे बसून जसे आहे तसे बोलायची आवश्यकता आहे ('मी कोण आहे' त्याची ओळख, ज्ञान प्राप्त करवून देण्याचा दोन तासाचा ज्ञानप्रयोग आहे. त्यात अठ्ठेचाळीस मिनिट आत्मा-अनात्माचा भेद करणारी भेदविज्ञानाची वाक्ये बोलवून घेतली जातात. जी सर्वांनी एकत्र बसून समूहात बोलायची असतात. त्या नंतर एका तासात पाच आज्ञा उदाहरणं देऊन सविस्तर समजावली जातात, की आता बाकीचे जीवन कसे व्यतीत केले पाहिजे की ज्यामुळे नवीन कर्म बांधली जाणार नाहीत आणि जूनी कर्म पूर्णपणे संपतील, त्याचबरोबर 'मी शुद्धात्मा आहे' हे लक्ष नेहमी राहिल.)

## १०. ज्ञानविधीमध्ये काय केले जाते?

आम्ही ज्ञान देतो, त्यामुळे कर्म भस्मीभूत होतात आणि त्यावेळी पुष्कळ आवरणं तूटतात. तेव्हा भगवंताची कृपा होते त्याच सोबत तो स्वतः जागृत होतो. जागल्यानंतर ही जागृति जात नाही. नंतर निरंतर जागृत राहू शकतो, म्हणजे निरंतर प्रतीति राहणारच. आत्म्याचा अनुभव झाला, म्हणजे देहाध्यास सुटला. देहाध्यास सुटला, म्हणजे कर्म बांधणे थांबले. पहिली मुक्ती अज्ञानतेपासून मिळते. मग एक दोन जन्मानंतर अंतिम मुक्ती मिळते.

## ज्ञानाग्निने होतात कर्म भस्मिभूत

ज्या दिवशी हे 'ज्ञान' देतात त्यादिवशी काय होते? ज्ञानाग्निने त्यांची जी कर्म आहेत, ती भस्मिभूत होऊन जातात. दोन प्रकारची कर्म भस्मिभूत होतात. आणि एक प्रकारचे कर्म बाकी राहतात. जी कर्म वाफ रुपेत आहेत, त्यांचा नाश होतो. आणि जी कर्म पाणीस्वरूप आहेत, त्यांचा सुद्धा नाश होतो पण जी कर्म बर्फस्वरूप आहेत, त्यांना मात्र भोगावेच लागते. कारण ती जमलेली आहेत आणि ती कर्म फळ देण्यासाठी तयार झालेली आहेत, ती मग सोडत नाही. पण पाणी आणि वाफस्वरूप जी कर्म आहेत, त्यांना ज्ञानाग्नि उडवून लावते, म्हणून ज्ञान मिळताच लोक एकदम हलके होऊन जातात, त्यांची जागृति एकदम वाढते. कारण जोपर्यंत कर्म भस्मिभूत होत नाहीत तोपर्यंत जागृति वाढतच नाही माणसाची. जे बर्फस्वरूप कर्म आहे ते तर आपल्याला अवश्य भोगायचे राहिलेत. आणि ते पण सरळपणे कसे भोगायचे त्याचे सगळे मार्ग आम्ही सांगितले की, 'भाऊ, या 'दादा भगवानांचा असीम जय जयकार हो' बोला, त्रिमंत्र बोला, नऊ कलमे बोला.'

संसारी दु:खांचा अभाव तो मुक्तीचा पहिला अनुभव म्हटला जातो. आम्ही 'ज्ञान' दिल्यानंतर लगेच दुसऱ्याच दिवशी तुम्हाला हा अनुभव येतो. मग शरीराचे ओझे, कर्माचे ओझे हे सर्व तुटतात तो दुसरा अनुभव. मग इतका आनंद होतो की त्याचे वर्णनच होऊ शकत नाही!!!

**प्रश्नकर्ता :** तुमच्याकडून ज्ञान मिळाले तेच आत्मज्ञान आहे ना?

**दादाश्री :** मिळाले ते आत्मज्ञान नाही, तुमच्या आत जे प्रकट झाले ते आत्मज्ञान आहे. ज्ञानविधीत आम्ही तुमच्याकडून बोलवून घेतो आणि तुम्ही बोलता त्यासोबतच पापं भस्मिभूत होतात आणि आत ज्ञान प्रकट होते. तुमच्या आत ते प्रकट झाले आहे ना?

**प्रश्नकर्ता :** हो, झाले आहे.

**दादाश्री :** आत्मा प्राप्त करणे ही काही सोपी गोष्ट नाही. त्यामागे

(ज्ञानविधीच्या वेळी) ज्ञानाग्निने पाप भस्मिभूत होतात. आणखी दुसरे काय होते? आत्मा आणि देह वेगळे होऊन जातात, तिसरे काय होते की भगवंताची कृपा उतरते. त्यामुळे मग निरंतर जागृती उत्पन्न होते आणि प्रज्ञेची सुरुवात होते.

## द्वितीयेतून पौर्णिमा

आम्ही ज्ञान देतो तेव्हा अनादिकाळापासून, म्हणजे लाखो जन्माची अमावस्या होती. अमावस्या समजते का तुम्हाला? 'नो मून' अनादिकाळापासून काळोखातच जगत आहेत सर्व. उजेड हा पाहिलाच नाही. चंद्र पाहिलाच नाही! आम्ही ज्ञान देतो तेव्हा चंद्रमा प्रकट होतो. तेव्हा प्रथम द्वितीयेच्या चंद्रासारखा उजेड होतो. आम्ही देतो पूर्ण ज्ञान पण तरी सुद्धा आत प्रकट किती होते? द्वितीयेच्या चंद्राइतकाच. नंतर ह्या जन्मात तुम्हाला पौर्णिमेपर्यंतचे काम करुन घ्यायचे. नंतर द्वितीयेतून तृतीया, तृतीयेतून चतुर्थी, चतुर्थीतून पंचमी होणार.... आणि पौर्णिमा झाली की मग तो पूर्ण झाला! अर्थात् केवळज्ञान प्राप्त झाले. कर्म बांधले जाणार नाहीत, कर्म बांधायचे थांबतील. क्रोध-मान-माया-लोभ बंद होतील. पूर्वी वास्तवात तुम्ही स्वत:ला चंदुभाऊ मानत होता, तीच भ्रांती होती. म्हणजे वास्तवात मी चंदुभाऊ आहे ही भ्रांती गेली. आता तुम्हाला ज्या आज्ञा दिल्या आहेत त्या आज्ञांमध्ये राहायचे.

तुम्ही जेव्हा ज्ञानविधीत याल तेव्हा तुमची सर्व पापे मी धुवून टाकेल, नंतर तुम्हाला स्वत:चे दोष दिसायला लागतील. आणि जेव्हा स्वत:चे दोष दिसायला लागले तेव्हा समजा की मोक्षाला जाण्याची तयारी सुरु झाली.

## ११. आत्मज्ञान प्राप्तीनंतर आज्ञापालनाचे महत्त्व.

## आज्ञा, ज्ञानाच्या रक्षणासाठी

आम्ही ज्ञान दिल्यानंतर तुम्हाला आत्मानुभव होतो. त्या नंतर कोणते

काम उरले? ज्ञानी पुरुषाच्या आज्ञेचे पालन करण्याचे. आज्ञा हाच धर्म आणि आज्ञा हेच तप. आमच्या आज्ञा संसार व्यवहारामध्ये बिलकुल बाधक होत नाहीत. संसारात राहून सुद्धा संसाराचा परिणाम होत नाही, असे हे अक्रम विज्ञान आहे.

सध्याचा हा काळ असा आहे की सर्वत्र कुसंग आहे. स्वयंपाक घरापासून ते ऑफिसपर्यंत, घरात, रस्त्यात, बाहेर, बसमध्ये, ट्रेनमध्ये सगळीकडेच कुसंग आहे. कुसंग आहे म्हणून हे जे ज्ञान मी तुम्हाला दोन तासात दिले आहे त्यास हा कुसंगच खाऊन टाकेल. कुसंग नाही का खाणार? म्हणूनच त्यासाठी पाच आज्ञांचे प्रोटेक्शन म्हणजेच संरक्षणांचे कुंपण दिले की त्याच्या रक्षणात राहिलात तर आतील स्थितीत जरा सुद्धा फरक पडणार नाही. हे ज्ञान त्याला जसे दिले आहे त्याच स्थितीत राहिल. जर कुंपण तुटले तर ते ज्ञान नष्ट होईल. सर्व धुळीत मिळेल.

हे ज्ञान तर मी तुम्हाला दिले आणि भेदज्ञानाने वेगळे पण केले पण आता ते वेगळेच राहू द्या. या साठी प्रोटेक्शन देतो की ज्यामुळे हा जो कलियुग आहे, हे कलियुगवाले त्याला लुटून न नेवो. 'बोधबीज' चा अंकुर उगवल्यानंतर पाणी वगैरे शिंपडायला हवे ना? जोपासना तर करावी लागणार की नाही?

## 'ज्ञान' नंतर कुठली साधना?'

**प्रश्नकर्ता :** या ज्ञानानंतर आता कुठल्या प्रकारची साधना करायला हवी?

**दादाश्री :** साधना तर, या पाच आज्ञांचे पालन करतात ना तीच! आता आणखीन कुठली साधना नाही. दुसरी साधना बंधनकर्ता आहे. या पाच आज्ञा सोडवणाऱ्या आहेत.

**प्रश्नकर्ता :** या ज्या पाच आज्ञा आहेत, याच्या व्यतिरिक्त आणि काही आहे?

**दादाश्री :** पाच आज्ञांचे एक कुंपण आहे, तुमच्यासाठी. ज्यामुळे आत तुमचा माल कोणी चोरु शकणार नाही, हे कुंपण जर तुम्ही सांभाळून ठेवले तर आत आम्ही जे दिले आहे ते एक्झेक्ट, तसेच्या तसेच राहिल, आणि कुंपण कमजोर झाले तर कोणी आत घुसून बिघडवेल. तेव्हा परत मला रिपेर करायला यावे लागेल. म्हणून या पाच आज्ञांमध्ये राहाल तोपर्यंत निरंतर समाधीची आम्ही गॅरंटी देतो.

## आज्ञापालनामुळे वेगाने प्रगती

**प्रश्नकर्ता :** आपले ज्ञान प्राप्त केल्यानंतर आमची, महात्म्यांची जी प्रगती होते त्या प्रगतीचे वेग कशावर अवलंबून असेल? काय केल्याने वेगाने प्रगती होईल?

**दादाश्री :** पाच आज्ञा पाळल्या तर सर्व काही वेगाने होईल, पाच आज्ञाच प्रगतीचे कारण आहे. पाच आज्ञा पाळल्याने आवरणे तुटू लागतात. शक्ती प्रकट होऊ लागतात. ज्या शक्ती अव्यक्त आहेत त्या व्यक्त होऊ लागतात. पाच आज्ञांचे पालन केल्यामुळे ऐश्वर्य व्यक्त होत असते. सर्व प्रकारच्या शक्ती प्रकट होतात. सर्वकाही आज्ञापालनावर अवलंबून आहे.

आमच्या आज्ञेच्याप्रति सिन्सियर राहणे तो सर्वात मोठा, मुख्य गुण आहे, आमच्या आज्ञांचे पालन केल्यामुळे जो अबुध झाला तो आमच्या सारखाच होणार ना! परंतु जोपर्यंत आज्ञांचे सेवन करत आहे, तोपर्यंत आज्ञेमध्ये फेरफार व्हायला नको. मग काहीच हरकत नाही.

## दृढ निश्चयानेच आज्ञा पालन!

दादाजींच्या आज्ञांचे पालन करायचे आहे, हीच सर्वात मोठी गोष्ट आहे. आज्ञांचे पालन करायचा निश्चय करायला हवा. आज्ञांचे पालन होत आहे की नाही ते तुम्हाला पाहायचे नाही. आज्ञांचे पालन जितके होऊ शकेल तितके बरोबर, पण तुम्हाला निश्चय करायला हवा की आज्ञांचे पालन करायचे आहे.

**प्रश्नकर्ता :** आज्ञा कमी-जास्त पाळली गेली तर काही हरकत नाही ना?

**दादाश्री :** 'हरकत नाही' असे नाही. तुम्ही निश्चय करा की आज्ञा पाळायच्याच आहे! सकाळपासूनच निश्चय करा की, 'पाच आज्ञांमध्येच राहायचे आहे, आज्ञा पाळायच्याच आहेत.' निश्चय केला, तेव्हापासूनच माझ्या आज्ञेत आलात, मला इतकेच हवे आहे.

आज्ञा पालन करायला विसरलात तर प्रतिक्रमण करा, की 'हे दादाजी, हे दोन तास विसरलो, आपली आज्ञा विसरलो पण मला तर आज्ञा पाळायच्याच आहे, मला क्षमा करा.' तर मागचे सारे माफ, शंभरा पैकी शंभर मार्क पूरे, मग त्याची जोखिमदारी राहिली नाही. आज्ञेत येऊन गेलात तर संसार स्पर्श करू शकणार नाही. आमच्या आज्ञेचे पालन केल्यामुळे तुम्हाला काहीही स्पर्श करणार नाही.

## 'आज्ञा' पाळल्याने खऱ्या पुरुषार्थाची सुरुवात

मी तुम्हाला ज्ञान दिले तेव्हा तुम्हाला प्रकृतीपासून वेगळे केले. 'मी शुद्धात्मा' म्हणजे पुरुष आणि त्यानंतर खरा पुरुषार्थ आहे, रियल पुरुषार्थ आहे हा.

**प्रश्नकर्ता :** रियल पुरुषार्थ आणि रिलेटिव्ह पुरुषार्थ या दोघांमधील फरक सांगा ना!

**दादाश्री :** रियल पुरुषार्थात करायचे काहीच नसते. दोघांमध्ये फरक हा आहे की रियल पुरुषार्थ म्हणजे 'पाहणे' आणि 'जाणणे.' आणि रिलेटिव्ह पुरुषार्थ म्हणजे काय? भाव करणे. मी असे करेन.

तुम्ही चंदुभाऊ होते आणि तेव्हा जे पुरुषार्थ करत होते तो भ्रांतीचा पुरुषार्थ होता. परंतु जेव्हा 'मी शुद्धात्मा आहे' याची प्राप्ती केली आणि त्यानंतर पुरुषार्थ कराल, दादांच्या पाच आज्ञांमध्ये रहाल तो होईल रियल पुरुषार्थ. पुरुष होऊन पुरुषार्थ केला असे म्हटले जाते.

**प्रश्नकर्ता :** ज्ञानबीज पेरले तोच प्रकाश आहे, तीच ज्योती आहे का?

**दादाश्री :** हो, तोच! परंतु ते केवळ बीजरुपाने. आता हळूहळू पौर्णिमा होईल. पुद्‌गल आणि पुरुष वेगळे झाल्यानंतर खरा पुरुषार्थ सुरु होतो. आणि जिथे पुरुषार्थ सुरु झाला तिथे द्वितीयेपासून पौर्णिमेपर्यंत पोहोचेल. हो! आज्ञा पालन केल्यामुळे असे घडते. आणखी काही करायचे नाही, फक्त आज्ञांचे पालन करायचे आहे.

**प्रश्नकर्ता :** दादाजी, पुरुष झाल्यानंतरच्या पुरुषार्थाचे थोडे वर्णन सांगाल का? ती व्यक्ती मग व्यवहारात कशी वागत असते?

**दादाश्री :** हे सर्व व्यवहारातच आहे ना, आपले सर्व ज्ञान घेतलेले महात्मा पाच आज्ञांमध्ये राहतातच ना! पाच आज्ञा तेच दादा, तोच रियल पुरुषार्थ.

पाच आज्ञा पाळायचा हाच पुरुषार्थ. आणि पाच आज्ञा पाळण्याचा परिणाम स्वरूप काय होते? ज्ञाता-दृष्टा पदामध्ये राहता येते. आणि आम्हाला कोणी विचारले की खरा पुरुषार्थ काय? तर आम्ही सांगू ज्ञाता-दृष्टा राहायचे हाच. या पाच आज्ञा ज्ञाता-दृष्टा पदात राहण्याचेच शिकवतात ना!

आम्ही पाहतो जिथे जिथे ज्याने खऱ्या मनाने, हृदयापासून पुरुषार्थ सुरु केलेला आहे त्यांच्यावर आमची कृपा अवश्य असणारच.

## १२. आत्मानुभव तीन टप्प्यात, अनुभव-लक्ष-प्रतिती

**प्रश्नकर्ता :** आत्म्याच्या अनुभवानंतर काय होते?

**दादाश्री :** आत्म्याचा अनुभव झाला म्हणजे देहाध्यास सुटला. देहाध्यास सुटला म्हणजे कर्म बांधायचे थांबले. याच्याहून अधिक काय हवे?

अगोदर चंदुभाऊ काय होते आणि आज चंदुभाऊ काय आहे हे समजता येते. हे परिवर्तन कसे घडते? तर आत्मनुभावामुळे. आगोदर देहाध्यासाचा अनुभव होता, आणि आता हा आत्मानुभव आहे.

प्रतीति म्हणजे मान्यता पूर्ण शंभर टक्के बदलली आणि 'मी शुद्धत्माच आहे' हीच गोष्ट निश्चित झाली. 'मी शुद्धात्मा आहे' अशी श्रद्धा बसते पण परत ती तुटते परंतु प्रतीति तुटत नाही. अर्थात् श्रद्धा बदलू शकते पण प्रतीति मात्र कधीही बदलत नाही.

प्रतिती म्हणजे समजा आम्ही येथे एक काठी ठेवली आता जर त्या काठीवर खूप दबाव आला तर ती जरा अशी वाकडी होईल परंतु स्थान सोडणार नाही. जरी कितीही कर्माचा उदय आला, अगदी वाईट उदय आला पण तरीही स्थान सोडणार नाही. 'मी शुद्धात्मा आहे' हे कधी लुप्त होणार नाही.

अनुभव, लक्ष आणि प्रतिती हे तीनही राहतील. प्रतिती नेहमीसाठी राहील. लक्ष कधी-कधी राहील. व्यापारात किंवा कुठल्यातरी कामात व्यस्त झाले की लक्ष हरवेल पण काम संपल्यावर ते पुन्हा प्राप्त होईल. अनुभव केव्हा येईल की जेव्हा काम वगैरे सर्वातून निवृत्त होऊन एकांतात बसले असाल तेव्हा अनुभवाचा स्वाद येईल. तसे अनुभव तर वाढतच जातो.

अनुभव लक्ष आणि प्रतिती पाया आहे. तो पाया बनल्यानंतरच लक्ष उत्पन्न होते, त्यानंतर 'मी शुद्धात्माा आहे' हे निरंतर लक्षात राहते. जेव्हा आरामात निवांत बसले असाल आणि काहीवेळेसाठी ज्ञाता-दृष्टा राहिले तेव्हा ते अनुभवात येते.

## १३. प्रत्यक्ष सत्संगाचे महत्त्व

### गुंतागुंतीच्या समाधानासाठी सत्संगाची आवश्यकता

या अक्रम विज्ञानाच्या माध्यमातून तुम्हाला देखील आत्मानुभवच

प्राप्त झाला आहे. परंतु ते तुम्हाला सहज प्राप्त झाला आहे म्हणून तुम्हाला स्वत:ला फायदा होतो, प्रगतीची सुरुवात होते. ज्ञानीच्या परिचयात जास्तीत जास्त राहून समजून घेण्याची गरज आहे.

हे ज्ञान खूप सखोल समजावे लागेल. कारण की हे ज्ञान एका तासात दिले आहे. किती मोठे ज्ञान! करोड वर्षात सुद्धा नाही होऊ शकेल ते ज्ञान येथे मात्र एका तासात होत असते! परंतु ते बेसिक (पायाभूत) ज्ञान प्राप्त होते तेव्हा सविस्तर समजून घ्यावे लागेल ना? त्यास सविस्तर समजण्यासाठी जर तुम्ही माझ्या जवळ बसून प्रश्न विचाराल तर मी तुम्हाला समजावेल. म्हणूनच आम्ही म्हणत असतो की सत्संगाची नितांत आवश्यकता आहे. तुम्ही जसजसे विचारत जाल तसतसा तुमचा गुंता उलगडत जाईल. ज्यांना टोचत असेल त्यांनी विचारावे.

## बीज रोवल्यानंतर पाणी शिंपडणे आवश्यक

**प्रश्नकर्ता :** ज्ञान घेतल्यानंतर देखील 'मी शुद्धात्मा आहे' हे ध्यानात ठेवावे लागते ते थोडेसे कठीण आहे.

**दादाश्री :** नाही, असे (आपोआप) व्हायला पाहिजे. ठेवावे लागत नाही, ते आपोआपच राहील. त्यासाठी काय करावे लागेल? त्यासाठी माझ्याजवळ येत राहावे लागेल. बी रोवल्यानंतर पाणी शिंपडायला पाहिजे ते शिंपडले जात नाही म्हणून तर सगळ्या अडचणी येतात. तुम्ही व्यापारात लक्ष दिले नाही तर काय होईल?

**प्रश्नकर्ता :** व्यापार बसेल.

**दादाश्री :** हो, असेच यात सुद्धा आहे, ज्ञान प्राप्त केल्यानंतर त्यावर पाणी शिंपडावे लागेल, तेव्हाच रोपटे मोठे होईल. छोटे रोपटे असते ना, त्यावर सुद्धा पाणि शिंपडावे लागते. तर कधी महिन्या दोन महिन्याने थोडे पाणी शिंपडत जा तुम्ही.

**प्रश्नकर्ता :** घरी शिंपडतो ना.

**दादाश्री :** नाही, घरी असलेले चालणार नाही. असे कधी चालेल का? ज्ञानी प्रत्यक्ष येथे आले असतील आणि तरी तुम्हाला त्याची किंमतच नाही! शाळेत गेलेलात की नाही? किती वर्षे गेलात?

**प्रश्नकर्ता :** दहा वर्ष.

**दादाश्री :** मग तेव्हा तिथे काय शिकलात? भाषा! ही इंग्रजी भाषा शिकण्यासाठी दहा वर्षे काढली, मग येथे माझ्याजवळ तर मी फक्त सहा महिनेच सांगतो. सहा महिनेच जर माझ्या मागे फिरत राहिलात तर तुमचे(मोक्षाचे) काम होऊन जाईल.

## दृढ निश्चय असेल तर अंतराय तुटतील

**प्रश्नकर्ता :** माझे बाहेरचे सर्व कार्यक्रम ठरले आहेत त्यामुळे येण्यास अडचण होईल.

**दादाश्री :** हे तर आपला भाव स्ट्राँग असेल तर त्या अडचणी दूर होतील. तुमचा भाव मजबूत आहे की पोकळ आहे ते बघून घ्यायचे.

## गॅरंटी सत्संगाने, संसाराच्या फायद्याची

**दादाश्री :** माझ्याकडे सर्व व्यापारी येतात ना, ते असे व्यापारी असतात की ते जर दुकानात एक तास उशिरा गेले तर पाचशे-हजार रुपयांचे नुकसान होईल. त्यांना मी सांगितले, तुम्ही येथे याल तेवढा वेळ, तुमचे नुकसान होणार नाही आणि जर मध्येच रस्त्यात कोणाच्यातरी दुकानात अर्धा तास थांबलात तर तुमचे नुकसान होईल. येथे याल तर जबाबदारी माझी. कारण यात मला काही देणेघेणे नाही. तुम्ही येथे तुमच्या आत्म्यासाठी आले आहात. म्हणून मी सर्वांनाच सांगतो की जर येथे याल तर तुमचे कुठल्याही प्रकारचे नुकसान होणार नाही.

## दादांच्या सत्संगाची अलौकिकता

जर कर्माच्या उदयाचे जोर खूप जास्त असेल तेव्हा तुम्हाला समजून घ्यायचे की हा उदय भारी आहे, म्हणून शांत राहायला हवे. आणि मग त्यास थंड करून सत्संगामध्ये बसून राहायचे. असे तर चालतच राहणार. कसे कसे कर्माचे उदय येतील हे सांगता येत नाही.

**प्रश्नकर्ता :** जागृती अधिक वाढावी त्यासाठी काय करावे.

**दादाश्री :** त्यासाठी तर सत्संगात जास्तीत जास्त वेळ बसून राहायचे हाच उपाय आहे.

**प्रश्नकर्ता :** आपल्याजवळ सहा महिने बसल्यास त्याच्यात स्थूळ परिवर्तन होईल, नंतर सूक्ष्म परिवर्तन होईल, असे म्हणायचे आहे का आपल्याला.

**दादाश्री :** हो, फक्त बसण्यानेच परिवर्तन होत राहील, म्हणजे येथे आमच्या परिचयात राहायला हवे. दोन तास, तीन तास, पाच तास. जितके जमा केले तितका लाभ. लोक ज्ञान घेतल्यानंतर असे समजतात की आता आम्हाला काहीच करायचे नाही! परंतु असे नाही! कारण अद्याप परिवर्तन हे तर झालेलेच नाही.

## ज्ञानीच्या विसीनीटीमध्ये रहा

**प्रश्नकर्ता :** पूर्णपद प्राप्त करण्यासाठी महात्म्यांना काय गरजेचे आहे ?

**दादाश्री :** जेवढे शक्य असेल तेवढे ज्ञानींच्या सहवासात जीवन व्यतीत करावे तेवढीच गरज आहे. आणखी कुठली गरज नाही, रात्रंदिवस, जरी कुठेही असले तरी दादांजवळच राहिले पाहिजे. त्यांची (आत्मज्ञानीची) विसीनिटीत (दृष्टी पडेल असे) राहिले पाहिजे.

येथे सत्संगात बसल्या बसल्या कर्माचे ओझे कमी होत जाते

आणि बाहेर तर कर्मांचे ओझे वाढतच राहते. तिथे तर केवळ अडचणीच समोर येतात. आम्ही तुम्हाला गॅरंटी देतो की जेवढा वेळ तुम्ही 'येथे' सत्संगात बसाल तेवढ्या वेळेसाठी तुमच्या काम-धंद्यात कधीही, काहीही नुकसान होणार नाही आणि तुम्ही जर हिशोब काढाल तर तुम्हाला आढळेल की एकंदरी फायदाच झाला आहे. हा सत्संग काय सामान्य सत्संग आहे ? केवळ आत्म्यासाठीच जो वेळ काढेल त्याला संसाराचे नुकसान कसे होऊ शकेल ? निव्वळ फायदाच होत असतो ? पण हे जर त्याला समजले तर काम होईल ना ? या सत्संगात तो बसला म्हणून त्याचे येथे येणे असेच वाया जात नाही ? हा तर किती सुंदर काळ आला आहे ! भगवंताच्या काळात जर सत्संगाला जायचे असेल तर चालतच जावे लागत होते ! आणि आज तर बस किंवा ट्रेनमध्ये बसले की लगेच सत्संगात पोहचू शकतो.

## प्रत्यक्ष सत्संग ते सर्वश्रेष्ठ

येथे सत्संगात बसलेले असाल आणि जरी काहीही केले नाही तरी सुद्धा आत परिवर्तन होतच राहील. कारण हा सत्संग आहे, सत् अर्थात आत्मा, आत्म्याचा संग ! हे प्रकट झालेले सत् त्यांच्या संगमध्ये बसले आहात. हा अंतिम प्रकारचा सत्संग म्हटला जातो.

सत्संगात बसून राहिल्याने हे सर्व संपेल. सर्व संपुष्टात येईल. कारण आमच्या सोबत राहिल्यामुळे, आम्हाला (ज्ञानीला) पाहिल्याने आमच्या डायरेक्ट शक्ती प्राप्त होतात, त्यामुळे जागृति एकदम वाढते. सत्संगामध्येच राहता येईल असे काही आयोजन करायला पाहिजे. 'या' सत्संगाचा सतत साथ राहिला तर काम पूर्ण होऊन जाईल.

काम काढून घेणे म्हणजे काय ? जमेल तितके जास्त वेळ दर्शन घेणे. शक्य तेवढे जास्त सत्संगात येऊन प्रत्यक्ष ज्ञानींचा लाभ घ्यावा. प्रत्यक्ष ज्ञानींचा सत्संग. ते जर शक्य नसेल तर शेवटी त्यासाठी खेद व्यक्त करावा ! ज्ञानी पुरुषांचे दर्शन करायचे आणि त्यांच्याजवळ सत्संगात बसून राहायचे.

## १४. दादांची पुस्तके तथा मेगेजीन वाचण्याचे महत्त्व

### आप्तवाणी, कशी क्रियाकारी!

ही ज्ञानी पुरुषाची वाणी आहे आणि ती सुद्धा ताजी आहे. आत्ताचे पर्याय आहेत म्हणून ती वाचताच आपले सर्व पर्याय बदलत जातात व आनंद उत्पन्न होत जातो. कारण ही वीतरागी वाणी आहे. राग-द्वेष विरहित वाणी असेल तरच काम होते अन्यथा काम होऊ शकत नाही. भगवंताची वाणी वीतराग होती त्यामुळे त्या वाणीचा प्रभाव आजपर्यंत पडत आहे. तर 'ज्ञानी पुरुषांच्या वाणीचा सुद्धा प्रभाव पडतो.' वीतराग वाणीशिवाय इतर कोणताही उपाय नाही.

### प्रत्यक्ष परिचय शक्य नसेल तेव्हा

**प्रश्नकर्ता :** दादाजी, जर आम्हाला परिचयात राहता येत नसेल तर पुस्तके कितपर्यंत मदत करतात.

**दादाश्री :** ते सर्व मदत करतात. येथील ही प्रत्येक वस्तू दादांची, पुस्तकातील शब्द दादांचे आहेत, आशय दादांचा आहे, म्हणजे या सर्व वस्तू मदत करतात.

**प्रश्नकर्ता :** परंतु साक्षात परिचय आणि यात फरक आहे ना?

**दादाश्री :** तसे जर पाहायला गेलो तर सर्वांमध्येच फरक असतो. म्हणून तुम्हाला ज्यावेळी जे उपलब्ध असेल ते करायचे. दादा नसतील तेव्हा काय कराल? तर दादांची पुस्तके वाचावित, पुस्तकात दादाच आहेत ना? नाहीतर डोळे मिटले की लगेच दादा दिसतील.

## १५. पाच आज्ञांमुळे जगत निर्दोष.

### आत्माज्ञानानंतर सुरूवात निजदोष दर्शनाची

'स्वरूप ज्ञाना' शिवाय तर (स्वत:ची) चूक दिसतच नाही. याचे

कारण 'मी चंदुभाऊ' आणि माझ्यात तर कुठलेही दोष नाही. मी तर शहाणा-समंजस आहे असेच वाटते. आणि 'स्वरूप ज्ञाना'ची प्राप्तीनंतर तुम्ही निष्पक्षपाती झाले, मन-वचन-कायेवर तुमचा पक्षपात राहिला नाही. म्हणूनच तुम्हाला तुमच्या चुका दिसतात.

ज्यांना स्वतःची चूक समजेल, ज्यांना क्षणोक्षणी स्वतःची चूक दिसते, जिथे जिथे चूक असेल तिथे दिसते, तो स्वतः 'परमात्मा स्वरूप' झाला! 'मी चंदुभाऊ नाही, मी शुद्धात्मा आहे' हे समजल्यानंतरच निष्पक्षपाती होता येते. इतर कोणाचा जरा सुद्धा दोष दिसणार नाही आणि स्वतःचे सर्व दोष दिसतील तेव्हा स्वतःचे काम पूर्ण झाले असे म्हटले जाईल. स्वतःचे दोष दिसायला लागले तेव्हापासूनच आम्ही दिलेले 'ज्ञान' परिणमित होणे सुरु होते. जेव्हा स्वतःचे दोष दिसायला लागतात तेव्हा दुसऱ्यांचे दोष दिसत नाहीत. दुसऱ्यांचे दोष दिसतात हा तर फार मोठा गुन्हा म्हटला जातो.

या निर्दोष जगात जेथे कोणीच दोषित नाही, तेव्हा मग कोणास दोष द्यावा? दोष आहे तोपर्यंत अहंकाराचे निर्मुलन होणार नाही. अहंकाराचे निर्मुलन होईपर्यंत स्वतःचे दोष धुवायचे.

आत्ता सुद्धा कोणी दोषीत दिसत असेल तर ती आपलीच चूक आहे, केव्हा ना केव्हातरी निर्दोष पाहावेच लागेल ना? हे सर्व आपल्या हिशोबानुसारच आहे इतके थोडक्यात जरी समजून घेतले तरी खूप उपयोगी पडेल.

## आज्ञापाळल्याने वाढते निर्दोष दृष्टी

मला जग निर्दोष दिसत आहे. तुमची अशी दृष्टी होणार तेव्हा हे कोडे सुटेल. मी तुम्हाला असा प्रकाश देईल आणि इतकी पापं धुवून टाकेल की ज्यामुळे तुम्हाला प्रकाश राहणार आणि तुम्हाला निर्दोष दिसत राहील. आणि सोबत पाच आज्ञा देईल. त्या पाच आज्ञांमध्ये राहाल तर जे दिलेले ज्ञान आहे, त्यास जरा सुद्धा फ्रॅक्चर होऊ देणार नाही.

## तेव्हापासून झाले समकित

स्वत:चा दोष दिसला तेव्हापासून समकित झाले असे म्हटले जाईल. स्वत:चा दोष दिसला तेव्हा समजायचे की स्वतः जागृत झालो. नाहीतर सर्व झोपेतच चालले आहे. दोष समाप्त झाले की नाही याची जास्त काळजी करण्यासारखे नाही परंतु खरी आवश्यकता जागृतीची आहे. जागृती झाल्यानंतर नवीन दोष उभे होणे बंद होते आणि जे जुने दोष आहेत ते निघत जातात. आम्हाला त्या दोषांना पाहायचे की कशा प्रकारे दोष होत आहेत!

## जितके दोष तितकेच पाहिजे प्रतिक्रमण

अनंत दोषांचे भाजन आहे तर तितकेच प्रतिक्रमण करावे लागतील. जितके दोष भरून आणले असतील ते सर्व तुम्हाला दिसतील. ज्ञानी पुरुषांनी ज्ञान दिल्यानंतर दोष दिसायला लागतात, नाहीतर स्वत:चे दोष स्वत:ला दिसत नाहीत, याचेच नाव अज्ञानता. स्वत:चा एकही दोष दिसत नाही आणि दुसऱ्यांचे बघायचे असतील तर भरपूर दिसतील, त्यास म्हणतात मिथ्यात्व.

## दृष्टी स्वत:च्या दोषांप्रती

हे ज्ञान घेतल्यानंतर मनात वाईट विचार आले त्यांना पाहावे, चांगले विचार आले त्यांनाही पाहावे. चांगल्यावर राग नाही आणि वाईटावर द्वेष नाही. चांगले-वाईट बघण्याची आपल्याला गरजच नाही. कारण मुळात ती सत्ताच आपल्या ताब्यात नाही, म्हणून ज्ञानी काय पाहतात? संपूर्ण जगाला निर्दोष पाहतात. कारण हे सर्व डिस्चार्जमध्ये आहे, त्यात त्या बिचाऱ्यांचा काय दोष? तुम्हाला कोणी शिवी दिली तो 'डिस्चार्ज' आहे, बॉस तुम्हाला गोंधळात घालेल तो सुद्धा डिस्चार्जच आहे. बॉस तर निमित्त आहे. जगात कोणाचाही दोष नाही. दोष दिसतात ती सर्व स्वत:चीच चूक आहे. आणि तेच 'ब्लंडर' आहे आणि त्यामुळेच हे जग कायम आहे. दोष पाहिल्याने, उलटे पाहिल्याने वैर बांधले जाते.

❖❖❖❖❖

# एडजस्ट एवरीव्हेर

## पचवा एकच शब्द

'एडजस्ट एवरीव्हेर'. म्हणजे 'सर्वांसोबत जुळवून घेणे' फक्त हा एवढाच शब्द जर तुम्ही जीवनात अंगीकारला तरी खूप झाले. तुम्हाला शांति आपोआपच मिळेल. कलियुगातील अशा भयंकर काळात तुम्ही जर एडजस्ट झाला नाहीत तर संपून जाल!

संसारात दुसरे काही करता आले नाही तरी हरकत नाही पण 'एडजस्ट' होता तर आलेच पाहिजे. समोरची व्यक्ती 'डिसएडजस्ट' होत असेल आणि आपण एडजस्ट होत राहिलो तर आपण संसारसागर तरुन जाऊ. ज्याला दुसऱ्यांशी अनुकूल होता आले, तो कहीधी दुःखी होणार नाही. 'एडजस्ट एवरीव्हेर'. एडजस्ट होणे हाच सर्वात मोठा धर्म. या काळात तर वेगवेगळया प्रकृती, तेव्हा एडजस्ट झाल्याशिवाय कसे चालणार?

हे आईस्क्रीम असे म्हणत नाही की, तुम्ही माझ्यापासून दूर व्हा. तुम्हाला खायचे नसेल तर नका खाऊ, पण ही म्हातारी माणसे त्यावर चिडतात. हे मतभेद तर जग बदलल्यामुळे झाले आहेत. ही मुले तर जगाप्रमाणे वागतील.

आम्ही काय सांगतो, की जगाप्रमाणे एडजस्ट व्हा. मुलगा नवीन टोपी घालून आला तर असे म्हणू नका की ही कुठून घेऊन आलास? त्यापेक्षा एडजस्ट होऊन त्याला विचारा 'अशी छान टोपी कुठून बरं आणलीस?' कितीला आणलीस? खूप स्वस्त मिळाली! असे एडजस्ट व्हा.

आपला धर्म काय म्हणतो की असुविधामध्ये सुद्धा सुविधा शोधा. रात्री मला विचार आला की ही चादर मळलेली आहे, पण मग मी एडजस्टमेन्ट केली, नंतर ती इतकी मऊ वाटू लागली की विचारू नका.

पंचेन्द्रियांचे ज्ञान असुविधा दाखवते आणि आत्मज्ञान सुविधा दाखवते. म्हणून आत्म्यात रहा.

हे तर चांगले किंवा वाईट म्हटल्यामुळे ते आपणास त्रास देत असते. आपण तर या दोन्ही गोष्टी समान करुन टाकाव्या. एकास चांगले म्हटले म्हणून दुसरे वाईट झाले, मग ते दुसरे आपल्याला त्रास देत राहते. कोणी खरे सांगत असेल त्याच्यासोबत आणि कोणी खोटे सांगत असेल त्याच्याहीसोबत एडजस्ट व्हा. आम्हाला कोणी म्हटले की, 'तुम्हाला अक्कल नाही' तर आम्ही लगेचच त्याला एडजस्ट होऊन जातो, आणि त्याला म्हणतो की, 'ती तर आधीपासूनच नव्हती! तू आता का बरे शोधायला आलास? तुला तर हे आज कळले पण मला हे लहानपणापासूनच माहित आहे,' असे म्हटल्याने भानगडच मिटते ना? मग पुन्हा तो आपल्याजवळ अक्कल शोधायला येणारच नाही.

## पत्नीसोबत एडजस्टमेन्ट

आपल्याला काही कारणामुळे उशीर झाला आणि बायको आपल्याला उलट-सुलट, वाटेल तसे बोलायला लागली, 'एवढ्या उशीरा येता, मला हे असे चालणार नाही,' वगैरे. तिचे डोके फिरले तर आपण असे म्हणायला हवे की, 'हो तुझे म्हणणे बरोबर आहे, तू जर म्हणत असशील तर मी परत जातो, नाहीतर तर आत येवून बसतो.' तेव्हा ती म्हणेल, 'नाही, परत नका जाऊ, मुकाट्याने येथे झोपा आत्ता!' मग आपण विचारायचे, 'तू म्हणशील तर जेवतो, नाहीतर झोपून जातो.' तेव्हा ती म्हणेल, 'नाही, आधी जेवून घ्या.' म्हणजे मग आपण तिचे ऐकून जेवून घ्यावे. अर्थात आपण एडजस्ट झालो. मग ती सकाळी मस्त पैकी चहा देईल. पण जर आपण तिला रागावलो तर सकाळी चहाचा कप आपटून ठेवेल आणि हे सर्व तीन दिवसांपर्यंत असेच चालत राहील.

## जेवणात एडजस्टमेन्ट

व्यवहार निभावला म्हणजेच तुम्ही 'एडजस्ट एवरीव्हेर' झाला!

आता हा डेवलपमेन्टचा काळ आला. मतभेद व्हायला नको! म्हणून आता मी लोकांना हे सूत्र दिले आहे, 'एडजस्ट एवरीव्हेर!' कढी खारट झाली तर समजून जायचे की दादाजींनी एडजस्टमेन्ट करण्यास सांगितले आहे. मग ती कढी थोडीशी खाऊन घ्यावी. जेवताना लोणचे हवे असल्यास सांगावे की लोणचे घेऊन ये परंतु भांडायचे नाही, घरात भांडण व्हायला नको. आपण जर कधी अडचणीत असलो आणि आपण स्वत:च तिथे 'एडजस्टमेन्ट' घेतली तर संसार शोभून दिसेल.

## जमत नाही तरीही निभावून घ्या.

तुझ्याशी जो कोणी डिसएडजस्ट होत असेल, त्यांच्याशीही तू एडजस्ट होऊन जा. दैनंदिन जीवनात जर सासू-सूनेत किंवा जावा-जावामध्ये डिसएडजस्टमेन्ट होत असेल पण ज्याला या संसार चक्रातून सूटायचे असेल, त्याने एडजस्ट व्हायलाच हवे. पती-पत्नी दौघांपैकी जर एक आरडाओरड करत असेल तर दुसऱ्याने त्याला सांभाळून घ्यायला हवे. तरच ते संबंध टिकतील आणि शांतता राहिल. या सापेक्ष सत्यात आग्रह, जिद्दीपणा थोडासुद्धा नको. माणूस म्हणजे कोण? तर जो एवरीव्हेर एडजस्टेबल असेल.

## सुधारायचे की एडजस्ट व्हायचे?

प्रत्येक गोष्टीत आपण समोरच्याशी एडजस्ट झालो तर किती सोपे होईल. आपण सोबत काय घेऊन जाणार आहोत? कोणी म्हणेल की, 'भाऊ, बायकोला सरळ कर' 'अरे तिला सरळ करायला जाशील तर तू वाकडा होऊन जाशील.' म्हणून बायकोला सरळ करायचा प्रयत्न करू नका. ती जशी आहे तशीच बरोबर आहे. तिच्याबरोबर आपले कायमचे नाते असते तर गोष्ट वेगळी. हे तर ह्या एका जन्मा नंतर दोघेही वेगळे होऊन जातील. दोघांचा मरणकाळ वेगळा, दोघांची कर्मे वेगळी! काहीच देण्या घेण्याचे संबंध नाही! येथून मग ती कोणाकडे जाते ते आपल्याला

माहित नाही? आपण तिला सरळ करायची आणि पुढच्या जन्मी ती जाईल कोणा दुसऱ्याचाच वाट्याला!!

म्हणून तुम्ही तिला सरळ करू नका आणि तिनेही तुम्हाला सरळ करायचे नाही, जे मिळाले ते सोन्यासारखे! कोणाचीही प्रकृती कधीही सरळ होत नाही, कुत्र्याचे शेपूट वाकडे ते वाकडेच राहाते. म्हणून आपण सावध राहिलेल बरे. ती जशी आहे तशी ठीक आहे. 'एडजस्ट एवरीव्हेर'!

## वाकड्यासोबत एडजस्ट व्हा

व्यवहार तर त्यास म्हणतात की 'एडजस्ट' होता येत असेल. म्हणजे मग शेजारचाही म्हणतो की 'सगळ्यांच्या घरी भांडणं होत असतात पण या घरी मात्र कधीही भांडण होत नाही.' ज्याच्याशी आपले पटत नाही तिथेच शक्ती विकसीत करावी लागते. जिथे पटते तिथे तर शक्ती आहेच. पटत नाही हा तर कमकूवतपणा आहे. माझे सगळ्यांसोबत का जमते? जेवढे एडजस्टमेन्ट घ्याल तेवढी शक्ती वाढेल, आणि अशक्ति दूर होईल. दुसऱ्या सगळ्या विपरीत समजूतींना कुलूप लागेल, तेव्हाच योग्य समज प्राप्त होईल.

सरळ-साध्या माणसांशी सगळे जण 'एडजस्ट' होतील पण वाकडे, कठोर, तापट स्वभाव असलेल्या माणसांशी, सगळ्यांशीच 'एडजस्ट' होता आले तर काम होईल. डोकं फिरुन तर चालणार नाही. जगातली कोणतीही वस्तू आपल्याला 'फिट'(अनुकूल) होत नसते, तेव्हा आपणच जर त्याला 'फिट' झालो तर हे जग सुंदर आहे. पण जर त्याला 'फिट' करायला गेलो तर ही दुनिया वाकडी आहे. म्हणून 'एडजस्ट एवरीव्हेर'.

आपल्याला गरज असेल तर समोरचा वाकडा असेल तरी त्याच्याशी समजूतीने व्यवहार करायला हवा. स्टेशनवर हमाल हवा असेल आणि तो पैशांसाठी वाद करीत असेल तर त्याला चार आणे जास्त देऊन सुद्धा त्याचे समाधान करावे. आणि जर तसे केले नाही, तर ती बॅग मग आपल्यालाच उचलावी लागेल ना!

# तक्रार? नाही, एडजस्ट

घरात सुद्धा एडजस्ट होता आले पाहिजे. तुम्ही सत्संगातून उशीरा घरी गेलात तर घरातील माणसे काय म्हणतील? वेळ सुद्धा जपली पाहिजे ना? मग आपण लवकर घरी जावे हे काय चुकीचे आहे? आता त्यांना असा मार का खावा लागतो? कारण पूर्वी (मागच्या जन्मात) पुष्कळ तक्रारी केल्या होत्या त्याचा हा परिणाम आला आहे. त्या दिवशी सत्तेवर आला, तेव्हा सारखी तक्रार करत होता. आता सत्ता नाही म्हणून तक्रार केल्याशिवाय राहायचे. म्हणून आता 'प्लस-माइनस' करुन टाका. समोरच्या व्यक्तीने शिवी दिली तर ती जमा करून घ्यावी. आपण फिर्यादी होवूच नये.

पती-पत्नी या दोघांनी जर निश्चय केला की मला 'एडजस्ट' व्हायचे आहे, तर दोघांचे समाधान होईल. त्याने जास्त खेचले तर आपण 'एडजस्ट' होऊन जायचे, म्हणजे दोघांचे समाधान होईल. एडजस्ट एवरीव्हेर' नाही झालात तर वेडे व्हाल. समोरच्याला डिवचत राहता म्हणूनच वेडे झाले आहात.

ज्याला 'एडजस्ट' व्हायची कला जमली तो जगातून मोक्षाकडे वळला. एडजस्टमेन्ट घेतली यास म्हणतात 'ज्ञान'. जो एडजस्टमेन्ट घ्यायला शिकला त्याचा बेडा पार.

कित्येकांना रात्री उशीरा झोपायची सवय असते आणि काही जणांना लवकर झोपायची सवय असते. तर त्या दोघांचा मेळ कसा बसेल? आणि एका कुटुंबातच सर्व जण एकत्र राहत असतील तर काय होईल? घरात एक जण असेही बोलणारा निघेल की तुमच्यात अक्कल कमी आहे, तेव्हा आपण समजावे की, हा असाच बोलणार. म्हणजे आपणच 'एडजेस्ट' व्हावे. त्या ऐवजी आपण त्याला समोर काही उत्तर दिले तर आपणच थकून जाऊ. कारण तो तर आपल्यावर आपटत आहे (वाद, भांडण करत आहे) पण जर आपणही त्याच्यावर आपटलो तर आपल्याला सुद्धा डोळे नाहीत अशी खात्री झाली ना!

आम्ही प्रकृतीला ओळखतो त्यामुळे तुम्ही आपटण्यासाठी (वादविवादासाठी) फिरत असाल तरी मी तुम्हाला आपटू देणार नाही, मी बाजूला होईल. नाहीतर दोघांचा एक्सिडन्ट होईल आणि दोघांचे स्पेरपार्टस तुटून जातील. एखाद्याचा बंपर तुटला तर गाडीत बसलेल्यांची काय अवस्था होईल? आत बसलेल्यांची दुर्दशा होऊन जाईल. म्हणून प्रकृतीला ओळखा. घरातिल सर्वांची प्रकृती ओळखून घ्यावी.

ही भांडणे काय रोजच्या रोज थोडीच होत असतात? हे तर जेव्हा आपल्या कर्माचा उदय होतो तेव्हा होतात तेवढ्या पुरते आपण 'एडजेस्ट' व्हायचे. घरात पत्नीसोबत भांडण झाले तर भांडण झाल्यानंतर बायकोला हॉटेलात घेऊन जायचे आणि छान जेवू घालून खूश करायचे. आता मात्र तंत रहायला नको.

जे ताटात वाढले असेल ते खावे. जे समोर आले ते संयोग आहे आणि भगवंतानी म्हटले आहे की जर संयोगाला धक्का मारशील तर तो धक्का तुलाच लागेल! म्हणून जरी नावडते पदार्थ आमच्या ताटात वाढलेले असतील तरीही आम्ही त्यातल्या दोन पदार्थ खातो.

'एडजेस्ट' होता येत नाही अशा माणसाला माणूस कसे म्हणायचे? जो संयोगाला वश होऊन एडजस्ट होतो त्या घरात काहीच झंझट होणार नाही. त्यांचा लाभ घ्यायचा असेल तर एडजस्ट व्हा. हे तर काही लाभ होत नाही आणि वैर बांधले जाते ते अधिक!

प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात काही प्रिन्सिपल (सिद्धांत) असायलाच हवेत. पण तरी संयोगानुसार वागायला हवे. संयोगानुसार एडजस्ट होतो तो माणूस. जर प्रत्येक परिस्थितीत एडजस्टमेन्ट करायला जमली तर थेट मोक्षापर्यंत पोहोचता येते असे हे फार आश्चर्यकारक हत्यार आहे.

## डिसएडजस्टमेन्ट हाच मूर्खपणा

आपली गोष्ट समोरच्या व्यक्तीला एडजस्ट झालीच पाहिजे. आपली

गोष्ट जर समोरच्याला 'एडजस्ट' झाली नाही, तर ती आपलीच चूक आहे, वीतरागींची गोष्ट 'एवरीव्हेर एडजस्टमेन्ट' ची आहे 'डिसएडजस्टमेन्ट' हाच मूर्खपणा आहे, 'एडजस्टमेन्ट' ला आम्ही न्याय म्हणतो, आग्रह, दुराग्रह यास काही न्याय म्हणता येणार नाही.

आत्तापर्यंत एकही माणूस, आम्हाला 'डिसएडजेस्ट' झालेला नाही. आणि लोकांना तर स्वत:च्या घरातील चार सदस्य सुद्धा 'एडजेस्ट' होत नाहीत. एडजस्ट होणे जमेल ना? की नाही जमणार? असे आपल्याकडून होऊ शकेल की नाही? पाहिल्यानंतर आपल्यालाही ते जमेलच ना! या जगाचा नियमच असा आहे की जेवढे तुम्ही पाहता तेवढे तर तुम्हाला जमूनच जाते. त्यात मग काही शिकण्यासारखे उरले नाही.

संसारात दुसरे काहीही जमले नाही तरी काही हरकत नाही. व्यापार करता कमी आले तरी चालेल, पण 'एडजेस्ट' होता मात्र आले पाहिजे. अर्थात् वस्तूस्थितीत 'एडजेस्ट' व्हायला शिकले पाहिजे. या काळात 'एडजस्ट' होता आले नाही तर मरून जाल. म्हणून 'एडजस्ट एवरीव्हेर' होऊन काम साधून घेण्यासारखे आहे.

❖❖❖❖❖

# संघर्ष टाळा

## नका पडू संघर्षात

'कोणाशी ही संघर्ष करू नका आणि संघर्ष टाळा.'

आमच्या या वाक्याचे जर आराधन कराल तर थेट मोक्षाला पोहोचाल. तुमची भक्ती आणि आमचे वचनबळ सर्वच काम करून देईल. आमचे हे एकच वाक्य जर कोणी अमलात आणले तर तो मोक्षाला जाईल.

आमचा एक शब्द एक दिवस जरी पाळला तरी गजबची शक्ती उत्पन्न होईल! आत एवढी अपार शक्ती आहे की कोणी कितीही संघर्ष (वादविवाद, भांडण) करायला आले तरी त्याला टाळता येईल.

चूकुन जरी तू कोणत्याही वादात अडकलास, तर लगेच त्याचे समाधान करून टाक. त्या वादविवादातून घर्षणाची ठिणगी उडू न देता सहजपणे तिथून निघून जा.

## ट्राफिकच्या नियमांमूळे संघर्ष टळतात

प्रत्येक संघर्षात नेहमीच दोघांचेही नुकसान होते. तुम्ही समोरच्या व्यक्तीला दु:खं दिले, तर त्याचक्षणी आपोआप तुम्हालाही दु:खं झाल्याशिवाय राहणारच नाही. ही टक्कर (संघर्ष) आहे म्हणून मी हे उदाहरण दिले आहे की रस्त्यावरील वाहतूकिचा काय धर्म आहे की कोणाला टक्कर दिली, धडक दिली तर तुम्ही मरुन जाल. टक्कर मारण्यात धोका आहे म्हणून कोणालाही टककर मारू नका. त्याच प्रकारे व्यवहारिक कार्यात सुद्धा संघर्ष करू नका.

एखादा माणूस भांडायला आला, त्याचे शब्द बॉम्बगोळ्यासारखे निघत असतील तेव्हा आपण हे लक्षात घ्यायला हवे की संघर्ष टाळायचा आहे. ध्यानी मनी नसताना अचानकच आपल्या मनावर काही परिणाम होऊ लागला तर आपण लक्षात घ्यावे की समोरच्या व्यक्तीचा प्रभाव

आपल्यावर होत आहे, अशा वेळेस आपण थोडे बाजूला व्हावे. हे सर्व संघर्ष आहेत. हे जसजसे तुम्हाला कळत जाईल तसतसे तुम्ही हे संघर्ष टाळत जाल. संघर्ष टाळल्याने मोक्ष मिळतो!

संघर्षामुळे हे जग निर्माण झाले आहे. भगवंताने त्याला वैरामुळे निर्माण झाले आहे असे म्हटले आहे. प्रत्येक माणूस, प्राणीमात्र वैर ठेवतो. वाद जर प्रमाणाबाहेर वाढला असेल तर वैर ठेवल्याशिवाय राहत नाही. मग कोणीही असो ते वैर ठेवतात. सगळ्यांच्यात आत्मा आहे. आत्मशक्ती सर्वांमध्ये सारखीच आहे. कारण पुद्‌गलच्या निर्बलतेमुळे सहन करावे लागत असते. पण सहन करण्यासोबत वैर ठेवल्याशिवाय राहत नाही. आणि पुढच्या जन्मी तो त्या वैराचे बदला घेतो!

एखादा माणूस खूप बोलतो तेव्हा त्याच्या वाटेल तशा बोलण्यानेही आपल्याला संघर्ष होता कामा नये. आपल्यामुळे समोरच्याला वाईट वाटेल असे बोलणे हा फार मोठा गुन्हा आहे

## सहन करु नका, सोल्युशन शोधा

संघर्ष टाळा याचा अर्थ सहन करणे नाही. सहन कराल तर ते कीती कराल? सहन करणे आणि 'स्प्रिंग' दाबणे. हे दोन्ही सारखेच आहे. 'स्प्रिंग' दाबून ठेवल्यावर ती किती दिवस राहिल? म्हणून सहन करायला तर शिकूच नका. उपाय करायला शिका. अज्ञानदशेत तर सहनच करावे लागते. पण मग एक दिवस स्प्रिंग उसळली तर सर्व उध्वस्त करून टाकते.

दुसऱ्यांच्या निमित्ताने जे काही सहन करावे लागले, तो आपलाच हिशोब असतो. परंतु ते आपल्याला कळत नाही की, हा कोणत्या खात्यातला आणि कुठला माल आहे, त्यामुळे आपल्याला असे वाटते की तो हा नवाच माल देत आहे. नवा माल कोणी देतच नाही. आपण दिलेलाच परत येतो. हे जे काही समोर आले, ते माझ्याच कर्माच्या उदयामुळे आले आहे. समोरचा तर निमित्तमात्र आहे.

## संघर्ष, आपल्याच चुकीमुळे

या जगात कोणाशीही संघर्ष होतो ती तुमचीच चूक आहे, समोरच्याची चूक नाही. समोरचा तर धडकणार आहेच. 'तुम्ही का बरे धडकलात?' तर म्हणाल, 'समोरचा धडकला म्हणून.' म्हणजेच तुम्ही आंधळे व तो ही आंधळा.

वाद झाला की आपण समजावे की 'असे कसे मी बोलून गेलो की त्यामुळे हा भांडण झाला!' स्वत:ची चूक समजली की समाधान होईल. नंतर पझल सॉल्व होईल. नाहीतर आपण जोपर्यंत 'समोरच्याची चूक आहे' असे शोधत राहू तोपर्यंत हे पझल सॉल्व होणारच नाही. 'आपली चूक आहे' याचा आपण स्वीकार करु तेव्हाच या जगातून सुटका होईल. कोणाशीही संघर्ष झाला तर ती आपल्या अज्ञानतेची निशाणी आहे.

समजा आत्ता जर का एक मुलाने दगड मारला आणि तुम्हाला रक्त निघाले, तेव्हा त्या मुलाला काय कराल? तर रागवाल. परंतु तुम्ही जात असताना डोंगरावरुन एक दगड पडला तो लागला आणि रक्त निघाले तेव्हा तुम्ही काय कराल? तुम्ही रागवाल? नाही. याचे कारण काय? तर तो दगड डोंगरावरुन पडला आहे म्हणून! त्या मुलाला तर नंतर पश्चात्तापही होत असेल, की हे माझ्या हातून असे कसे घडले? आणि डोंगरावरून पडला, ते कोणी केले.

## सायन्स, समजण्यासारखे

**प्रश्नकर्ता :** आपल्याला भांडायचे नसेल परंतु एखादी व्यक्ती समोरून भांडायला लागली तर काय करावे?

**दादाश्री :** जर या भिंतीसोबत भांडलात तर कितीवेळ भांडू शकाल? या भिंतीवर जर कधी डोके आपटले, तर आपण तिच्यासोबत काय करावे? डोके आपटले म्हणजे भिंतीबरोबर भांडण झाले, म्हणून काय आपण भिंतीला मारायचे? त्याच प्रमाणे जे खूप क्लेश देतात त्या

सर्व भिंतीच आहेत! यात आपण समोरच्याचे काय बघायचे? आपण स्वत:च समजून घ्यायचे की ते भिंतीसारखेच आहेत. मग काहीच प्रश्न उरत नाही.

भिंतीला ओरडण्याची सत्ता आपल्याला आहे का? तसेच त्या समोरच्या व्यक्तीसाठीही आहे. आणि त्याच्या निमित्ताने जे संघर्ष होणार आहे, ते तर होणारच. ते काय सोडणार नाही, मग उगाच आरडाओरड करण्यात काय अर्थ? त्याच्या हातात सत्ताच नाही! म्हणून तुम्ही भिंतीसारखे होवून जा ना! तुम्ही बायकोवर सारखे खेकसत राहिलात तर तिच्या आत पण परमेश्वर बसलेला आहे तो नोंद करेल की हा माझ्यावर खेकसतो. आणि ति जर तुमच्यावर खेकसत असेल तर तेव्हा तुम्ही त्या भिंतीसारखे होऊन जा, तर त्यावेळी तुमच्यात बसलेला परमेश्वर तुम्हाला मदत करेल.

एखाद्याबरोबर मतभेद होणे आणि भिंतीवर आपटणे या दोन्ही गोष्टी सारख्याच आहेत. या दोन्हीत फरक नाही. हा भिंतीवर आपटतो ते न दिसण्यामुळे आपटतो आणि मतभेद होतो ते सुद्धा न दिसल्यामुळेच होतो, पुढचे त्याला दिसत नाही. तिथे त्याला उपाय सुचत नाही त्यामुळे मतभेद निर्माण होतात. हे क्रोध-मान-माया-लोभ वगैरे जे करतात ते न दिसल्यामुळेच करतात! तर ही गोष्ट समजून घ्यायला हवी ना. ज्याला लागले त्याचा दोष, भिंतीचा त्यात काय दोष? असे या जगात सर्व भिंतीच आहेत. भिंतीवर आपटतो तेव्हा आपण तिच्याशी खरे-खोटे करायला जात नाही ना? की'हे माझे खरे आहे' असे ठरवायच्या भानगडीत आपण पडत नाही ना? असेहेही सर्व भिंतीसारखेच आहे. त्यांचाशी खरे-खोटे करण्याची काही आवश्यकता नाही.

## संघर्ष, ही अज्ञानताच आहे आपली

संघर्ष होण्याचे कारण काय? अज्ञानता. जोपर्यंत कोणासोबतही मतभेद होत असतो ती तुमच्या निर्बलतेची निशाणी आहे, लोक चूकीचे नाहीत. मतभेदामध्ये चूक तुमचीच आहे. लोकांची चूक नसतेच. तो

जाणून-बुजून करत असेल तर तिथे तुम्ही माफी मागून घ्यावी की, 'भाऊ, मला हे समजत नाही.' जिथे संघर्ष होतो तिथे आपलीच चूक आहे.

## घर्षणाने शक्ती कमी होते

सर्व आत्मशक्ति जर कधी संपत असेल तर ती घर्षणामुळे. घर्षणात जरा सुद्धा आपटलो तरी खलास! समोरचा आपटला तरी पण आपण संयमपूर्वक राहिले पाहिजे! संघर्ष तर व्हायलाच नको. मग हा देह जायचा असेल तर जावो परंतु कुठल्या ही परिस्थितीत संघर्ष व्हायला नकोच. केवळ हा संघर्ष नसेल तर मनुष्य मोक्षाला जाईल. जर कुणी इतकेच शिकला असेल की मला संघर्षात पडायचेच नाही, तर मग अशा माणसाला गुरुची किंवा कोणाच्याही कृपेची आवश्यकता नाही, एक-दोन जन्मातच तो सरळ मोक्षाला जाईल. 'घर्षणात यायचेच नाही' अशी श्रद्धा जर त्याच्यात निर्माण झाली आणि त्याने तसे ठाम ठरवले तेव्हापासूनच त्याला समकित झाला!

पूर्वी जे घर्षण झाले होते आणि जो तोटा झाला होता, तोच परत येतो. पण आता नवीन घर्षण उभे केले मात्र शक्ती निघून जाईल, आलेली शक्ती पण निघून जाईल. आणि जर आपण घर्षण होऊच दिले नाही, तर शक्ती उत्पन्न होतच राहील!

या संसारात वैराने घर्षण होते. संसाराचे मूळ बीज वैर आहे. ज्याचे वैर आणि घर्षण बंद झाले त्याचा मोक्ष झाला! प्रेम नडत नाही, वैर संपले तर प्रेम उत्पन्न होते.

## कॉमनसेन्स, एवरीव्हेर एप्लिकेबल

कोणी आपल्याशी संघर्ष केला तरी आपण कोणाशीही संघर्षात पडू नये, अशा प्रकारे राहिलो तर कॉमनसेन्स उत्पन्न होतो. परंतु आपण मात्र कोणासोबतही संघर्ष करायला नको, नाहीतर कॉमनसेन्स निघून जाईल. आपल्याकडून संघर्ष व्हायला नको. समोरच्या माणसाच्या संघर्षाने

आपल्यात ‘कॉमनसेन्स’ उत्पन्न होतो. आत्म्याची शक्ती अशी आहे की, संघर्षाच्या वेळेला कसे वागावे याचा सर्व उपाय दाखवून देते, आणि एकदा दाखविल्यानंतर ते ज्ञान जात नाही. असे करता करता ‘कॉमनसेन्स’ वाढत जातो.

या भिंतीसाठी उलट-सुलट विचार आले तर हरकत नाही, कारण ते एकतर्फी नुकसान आहे परंतु जिवंत लोकांसाठी एक जरी वाईट विचार आला तर मात्र जोखीम आहे. दोन्हीपक्षी नुकसान होणार. परंतु आपण त्यानंतर प्रतिक्रमण केले तर सर्वच दोष नाहीसे होतात. म्हणून जिथे जिथे घर्षण होत आहे तिथे नंतर प्रतिक्रमण करा म्हणजे घर्षण संपून जाईल.

ज्याला संघर्ष होत नाही त्याचा तीन जन्मात मोक्ष होईल याची गॅरंटी मी देतो. संघर्ष झालाच तर प्रतिक्रमण करून घ्यावे. कारण संघर्ष तर होणारच. जोपर्यंत विषयविकार आहे, संबंध आहे तोपर्यंत संघर्ष होणार. संघर्षाचे मूळ कारण विषयविकार हेच आहे. ज्याने विषयविकार जिंकला, त्याला कोणी हरवू शकणार नाही. कोणी त्याचे नावही घेणार नाही. त्याचा प्रभाव पडेल.

❖❖❖❖❖

# जे घडले तोच न्याय

## निसर्ग तर सदा न्यायीच आहे.

निसर्गाचा जो न्याय आहे तेथे एक क्षण सुद्धा अन्याय झाला नाही. एक क्षण सुद्धा हा निसर्ग अन्यायी झाला नाही. कोर्टात अन्याय झाला असेल, परंतु निसर्ग कधी अन्यायी होत नाही.

निसर्गाच्या न्यायाला जर नीट ओळराल की 'घडले तोच न्याय' तर तुम्ही या जगातून मुक्त होऊ शकाल. पण जर निसर्गाला जरा सुद्धा अन्यायी समजाल तर मात्र तुम्ही या जगात गुरफटून जाल. निसर्गाला न्यायी मानणे यालाच ज्ञान म्हणतात. 'जसे आहे तसे' समजणे, याचे नाव ज्ञान, 'जसे आहे तसे' न समजणे याचे नाव अज्ञान.

या जगात न्याय शोधू नका. न्यायामुळेच साऱ्या जगात लढाया झाल्या आहेत. जग हे न्यायस्वरूपच आहे. म्हणून या जगात न्याय शोधूच नका. 'जे घडले तोच न्याय.' जे घडून गेले तोच न्याय. हे कोर्ट वगैरे बनलेत, ते न्याय शोधायला निघालात म्हणूनच ना! अरे माणसा! तिथे न्याय होतो का? त्यापेक्षा काय घडले ते पाहा ना! हाच न्याय आहे. न्याय-अन्यायाचे फळ हे सारे हिशोबाने येते आणि आपण आपला न्याय त्याच्यासोबत जॉइन्ट करायला (जोडायला) जातो. म्हणून मग कोर्टातच जावे लागेल ना?

आपण कोणाला एक शिवी दिली तर तो आपल्याला दोन-तीन शिव्या देईलच. कारण त्याचे मन आपल्यावरील रागाने धुमसत असते. तेव्हा यावर लोक काय म्हणतील? तू त्याला तीन शिव्या का दिल्या? ह्याने तर एकच शिवी दिली होती. तर यात न्याय काय आहे? त्याने आम्हाला तीन शिव्या द्यायच्या अशाच हिशोबच होता. मागचा हिशोब तो वसूल करणार की नाही? निसर्गाचा न्याय आहे की मागचा हिशोब

असेल तो सर्व हिशोब एकत्र जोडून समोर आणतो. आज पतीला त्याची पत्नी त्रास देत असेल, तो निसर्गाचा न्यायच आहे. पती समजतो की ही पत्नी खूप वाईट आहे, आणि पत्नीला काय वाटते की पती वाईट आहे. परंतु हा निसर्गाचा न्यायच आहे.

ही तर ह्या जन्माची घामाची कमाई आहे परंतु पूर्वीचे सर्व हिशोब आहे ना! वहीखाते बाकी आहे म्हणून, नाहीतर कोणीही आपले काहीही घेऊ शकत नाही. कोणालाही घेण्याची शक्तिच नाही. आणि घेतो आहे तो आपला मागचा कित्येक जन्माचा हिशोब आहे. या जगात कोणी असा जन्माला आला नाही की जो कोणाला काही करु शकेल. इतके नियमबद्ध हे जग आहे.

## परिणामावरुन कारण कळते

हा सारा निकाल आहे. जसा परीक्षेचा निकाल लागतो ना, गणितात शंभर पैकी पंच्याण्णव गुण मिळाले आणि इंग्रजीत शंभर पैकी पंचवीस गुण मिळाले. तर काय आपल्या लक्षात येत नाही की, आपली कुठे चूक झाली? या परिणामावरुन कोणकोणत्या कारणाने चुका झाल्या ते आपल्याला समजते ना? हे सर्व संयोग जे एकत्र होतात, ते सारे परिणाम आहेत. आणि परिणामावरुन त्यामागे कारण काय होते ते आपल्याला कळते.

इथे रस्त्यात सर्व माणसे येत-जात असतात आणि रस्त्यातच बाभळीच्या काट्याची मोळी पडलेली असते. रस्त्यातून इतके लोक येत-जात असतात पण ती मोळी तशीच पडलेली असते. आपण कधी बूट, चप्पल घातल्याशिवाय निघत नाही, परंतु त्या दिवशी कोणाकडे गेलो असताना अचानक तिथे आरडाओरड झाली की, 'चोर आला, चोर आला' तेव्हा आपण अनवाणी पायाने पळतो, आणि तो काटा आपल्या पायात घुसतो, तर तो हिशोब आपला!

## परमेश्वराकडे कसे असते ?

परमेश्वर न्यायस्वरूप नाही तसेच अन्यायस्वरूपही नाही. कोणाला दु:खं होऊ नये हीच परमेश्वराची भाषा आहे. न्याय-अन्याय ही तर लोकभाषा आहे.

चोर, चोरी करण्यात धर्म समजतो, दानेश्वर दान देण्यात धर्म समजतो, ही लोकभाषा आहे, परमेश्वराची भाषा नाही. परमेश्वराकडे असे काहीच नाही. परमेश्वराकडे तर एवढेच आहे की, 'कोणत्याही जीवाला दु:खं होऊ नये, हीच आमची आज्ञा आहे!'

## निजदोष दाखवतो अन्याय

फक्त स्वत:च्या दोषामुळे सर्व जग बेकायदेशीर (अन्यायकारक) वाटते. जग बेकायदेशीर कोणत्याही क्षणी नसते. पूर्णपणे न्यायसंगतच असते. इथल्या कोर्टाच्या न्यायात फरक पडू शकतो. तो खोटा ठरु शकतो पण निसर्गाच्या न्यायात मात्र फरक होत नाही.

आणि एका सेकन्दासाठी सुद्धा न्यायात बदल होत नाही. जर अन्यायी असते तर कोणी मोक्षाला गेलेच नसते. कोणी म्हणेल, की चांगल्या माणसांना अडचणी का येतात ? पण इतर कोणीही अशी अडचण उभी करू शकतच नाही. कारण जर स्वत: कशातही हस्तक्षेप केला नाही, तर कोणाची हिंमत नाही की तुमचे नाव घेईल. आपण स्वत:च हस्तक्षेप केला होता म्हणून हे सारे घडले.

## जगत न्याय स्वरूप

हे जग खोटे नाही. जग न्यायस्वरूप आहे. निसर्गाने कधीही अन्याय केलेला नाही. निसर्ग माणसाला कापून टाकतो, अपघात होतो, हे सारे न्यायस्वरूप आहे. न्यायाबाहेर निसर्ग जात नाही. विनाकारण अज्ञानतेमुळे लोक काहीही बोलत राहतात आणि जीवन जगण्याची

कलाही अवगत नाही. नुसती चिंताच चिंता... म्हणून जे घडले, त्यास न्याय म्हणा.

'जे घडले तोच न्याय,' हे जर समजले तर संपूर्ण संसारसागर पार होईल. या जगात एक सेकन्ड पण अन्याय होत नाही. न्यायच होत राहिला आहे. म्हणजे बुद्धी आपली फसगत करवते की, याला न्याय कसे म्हणता येईल? म्हणून आम्ही मूळ गोष्ट सांगू इच्छितो की हे निसर्गाचे न्याय आहे, आणि बुद्धीपासून तुम्ही वेगळे होवून जा. अर्थात यात बुद्धी आपल्याला फसविते. एकदा समजून घेतल्यानंतर मग बुद्धीचे आपण ऐकायचे नाही. जे घडले तोच न्याय. कोर्टाच्या न्यायात चुकभूल होऊ शकते, परंतु ह्या न्यायात फरक होत नाही.

न्याय शोधून शोधून तर दम निघून गेला आहे. माणसाच्या मनात असे विचार येतात की मी याचे काय बिघडवले आहे, की तो माझे बिघडवत आहे?

न्याय शोधायला निघाले म्हणून तर सर्वांना मार पडत आहे. यासाठी न्याय शोधूच नये. न्याय शोधल्यामुळे या सर्वांना मार खाऊन वळ उमटले तरी शेवटी झाले तर तेच. शेवटी होता तिथला तिथेच. तर मग आधिच का नाही समजून घ्यायचे? ही तर केवळ अहंकारची दखल आहे.

## विकल्पांचा अंत हाच मोक्षमार्ग

आता बुद्धी जेव्हा विकल्प करविते ना, तेव्हा बुद्धीला सांगावे की 'जे घडले तोच न्याय'. बुद्धी न्याय शोधते की माझ्यापेक्षा लहान आहेस, तरी माझी मर्यादा ठेवत नाही. मर्यादा ठेवली हाही न्याय आणि नाही ठेवली तोही न्याय. बुद्धी जितकी निर्विवाद होईल तितकेच आपण निर्विकल्प होऊ!

न्याय शोधायला निघाले म्हणजे विकल्प वाढतच जाणार आणि हा नैसर्गिक न्याय विकल्पांना निर्विकल्प बनवित जातो. जे 'घडले तोच न्याय'

आहे आणि तरीही पाच व्यक्तींचा पंच जो निर्णय घेतो तेही नेमके त्याच्या विरुद्धच जाते. म्हणून त्या न्यायालाही तो स्वीकारत नाही, म्हणजे तो कोणाचेच ऐकत नाही. त्यामुळे मग विकल्प वाढतच जातात. स्वतःच्या अवतीभवती जाळेच गुंफत राहतो, असा माणूस काहीच प्राप्त करू शकत नाही. विनाकारण अतिशय दुःखी होतो! त्यापेक्षा पहिल्यापासूनच श्रद्धा ठेवावी की जे घडून गेले तोच न्याय.

आणि निसर्ग नेहमी न्यायच करीत असतो, निरंतर न्यायच करीत आहे पण पुरावा देऊ शकत नाही. पुरावे 'ज्ञानी' देतात की, न्याय कशा तऱ्हेने आहे? कसे घडले, हे सर्व 'ज्ञानी' सांगू सकतात. त्याला संतुष्टी देतात आणि तेव्हा द्विधा संपते व समाधान मिळते. निर्विकल्पी झालो तर समस्या संपूष्टात येते.

❖❖❖❖❖

# भोगतो त्याची चूक

## निसर्गाच्या न्यायालयात...

या जगाचे न्यायाधीश तर ठिकठिकाणी आहेत, परंतु कर्म जगाचा नैसर्गिक न्यायाधीश तर एकच आहे, जो 'भोगतो त्याची चूक' हा एकच न्याय आहे. त्यानुसार संपूर्ण जग चालत आहे आणि भ्रांतिच्या न्यायाने हा संपूर्ण संसार उभा आहे.

एक क्षण सुद्धा जग न्यायाबाहेर चालत नाही. ज्याला बक्षिस द्यायचे असेल त्याला बक्षिस देते. ज्याला दंड द्यायचा असेल त्याला दंड देते परंतु जग न्यायाबाहेर चालत नाही. न्यायातच आहे, संपूर्ण न्यायसंगतच आहे. परंतु समोरच्या व्यक्तीच्या दृष्टीस हे येत नसल्यामुळे त्याला समजत नाही. जेव्हा दृष्टी निर्मळ होईल तेव्हा न्याय दिसेल. स्वार्थदृष्टी असेपर्यंत न्याय कसा दिसणार?

## आपण का भोगायचे?

आपल्याला दु:खं का भोगावे लागले ते शोधून काढा ना?! हे तर आपण आपल्या चुकीमुळे बांधलेलो आहोत, लोकांनी येवून बांधलेले नाही. ती चूक संपताच मुक्त. आणि खरे तर आपण मुक्तच आहोत. परंतु चुकांमुळे बंधन भोगत असतो.

जगाच्या वास्तविकतेचे रहस्यज्ञान लोकांच्या लक्षातच नाही आणि ज्यामुळे सतत भटकावे लागते, त्या अज्ञान-ज्ञानाची सर्वांना माहिती आहे. तुमचा खिसा कापला, यात चूक कोणाची? त्याचा खिसा नाही कापला आणि तुमचाच का कापला? तुम्हा दोघांपैकी सध्या भोगतो कोण? भोगतो त्याची चूक. 'दादां'नी ज्ञानात 'जसे आहे तसे' पाहिले की, भोगतो त्याचीच चूक आहे.

## भोगणे स्वत:च्या चुकीमुळे

जो दु:खं भोगतो ती त्याची चूक आणि सुख भोगतो तर ते त्याचे

बक्षिस. परंतु भ्रांतिचा कायदा निमित्ताला पकडतो. परमेश्वराचा कायदा, रियल (खरा) कायदा तर ज्याची चूक असेल त्यालाच पकडणार. हा कायदा एक्झेक्ट आहे आणि त्यात कोणी बदल करू शकेल असे नाहीच. जगात असा कोणताही कायदा नाही की जो कोणाला दु:खं देऊ शकेल.

स्वत:ची चूक असेल तरच समोरचा काही बोलणार ना? म्हणून चूक मिटवुन टाका ना! या जगात कोणताही जीव कुठल्याही जीवाला त्रास देवू शकत नाही, असे स्वतंत्र जग आहे, कुणी त्रास देत असेल तर त्याचे कारण पूर्वी जी दखल केली होती त्याचा परिणाम आहे. म्हणून ती चूक संपवा मग त्याचा हिशोब राहणार नाही.

जग दु:खं भोगण्यासाठी नाही, सुख भोगण्यासाठी आहे. ज्याचा जेवढा हिशोब असेल तेवढे त्याला मिळते. कित्येक जण केवळ सुखच उपभोगत असतात. ते कशामुळे? कित्येक जण फक्त दु:खंच भोगत आहेत ते कशामुळे? त्यांनी तसा हिशोब सोबत आणलेला असतो म्हणून. स्वत:ला जे दु:खं भोगावे लागत आहे त्यात स्वत:चाच दोष आहे! दुसऱ्या कोणाचाही दोष नाही. जो दु:खं देतो त्याची चूक नाही. दु:खं देतो त्याची चूक संसारात, आणि जो भोगतो त्याची चूक हे परमेश्वरी कायद्यात.

## परिणाम, स्वत:च्या चुकीचा

जेव्हा जेव्हा आपल्याला काही भोगावे लागते ते आपल्याच चुकांचा परिणाम आहे. स्वत:च्या चुकीशिवाय आपल्याला भोग भोगावे लागत नाही. या जगात असा कोणी नाही जो आपल्याला किंचित्मात्र दु:खं देऊ शकेल आणि जर कोणी दु:खं देणारा आहे तर ते आपल्याच चुकीमुळे आहे. समोरच्याचा दोष नाही. तो तर निमित्त आहे. म्हणून जो भोगतो त्याची चूक.

पती-पत्नी आपसात खूप भांडत असतील आणि जेव्हा दोघे झोपायला गेल्यानंतर आपण गुपचुप पाहायला गेलो तर ती बाई बिनधास्त

झोपलेली असते. आणि तो भाऊ सारखा कुशी बदलत असतो तर आपण समजून जायचे की यात पतीचीच चूक आहे, कारण ती बाई भोगत नाही. ज्याची चूक असेल तोच भोगतो. आणि जर त्यावेळेला तो भाऊ झोपलेला असेल आणि ती बाई जागी असेल, तर समजावे की त्या बाईचीच चूक आहे. 'भोगतो त्याची चूक', हे तर फार गुह्य विज्ञान आहे! सारे जग निमित्तालाच दोष देत असते.

## परमेश्वराचा कायदा काय?

परमेश्वराचा कायदा तर काय म्हणतो की ज्या क्षेत्रात, ज्या काळात जो भोगतो तो स्वतःच गुन्हेगार आहे. आता कोणाचा खिसा कापला गेला तर त्या कापणाऱ्यासाठी आनंदाची गोष्ट आहे, तो तर मस्तपैकी जिलेबी खात असेल, हॉटेलात बसून चहापाणी आणि नाष्टा करीत असेल. आणि त्याच वेळी ज्याचा खिसा कापला गेला तो भोगत असेल. म्हणून 'भोगतो त्याची चूक'. त्याने पूर्वी कधीतरी चोरी केली असेल म्हणून आज तो पकडला गेला, आणि खिसा कापणारा तर जेव्हा तो पकडला जाईल तेव्हा त्याला चोर म्हटले जाईल.

संपूर्ण जग समोरच्याचीच चूक पाहतो. भोगत असतो स्वतः पण चूक समोरच्याचीच पाहतो. उलट त्यामुळे तर गुन्हे दुप्पट होत राहतात आणि व्यवहारातील गुंतागुंतीही वाढत जाते. ही गोष्ट जर नीट समजली तर गुंता सुटत जाईल.

या जगाचा नियम असा आहे की जे डोळ्यांनी दिसेल, त्यास चूक म्हणतात आणि निसर्गाचा नियम असा आहे की, जो भोगत आहे, त्याची चूक आहे.

कोणालाही किंचित्मात्र दुःखं द्यायचे नाही. कोणी आपल्याला दुःखं दिले ते आपण जमा करून टाकायचे. तर आपले वहीखाते चोख होतील. आता पुन्हा कोणाला द्यायचे नाही, नवीन व्यापार सुरु करायचा

नाही आणि जुना हिशोब बाकी असेल तर मांडवली करुन टाकायची म्हणजे तो हिशोब पूर्ण होईल.

## उपकारी, कर्मापासून मुक्त करविणारे

जगात दोष कोणाचाच नाही. दोष काढणाऱ्याचा दोष आहे. जगात दोषी कुणीच नाही. सगळे जण आपापल्या कर्माच्या उदयाने आहेत. जे कोणी भोगत आहेत तो काही, आजच गुन्हा नाही. हे सारे मागच्या जन्मीच्या कर्मांचे फलित आहे. आज तर त्याला पश्चाताप होत असेल, परंतु पूर्वी करार झालेला आहे त्याचे काय? तो करार पूर्ण केल्याशिवाय तर गत्यंतरच नाही.

सून सासूला दुःखं देते किंवा सासू सूनेला दुःखं देते, यात कोणाला भोगावे लागते? सासूला. तर सासूची चूक आहे. सासू सूनेला दुःखं देत असेल, तर सूनेने हे गृहीतच धरायला हवे की यात माझीच चूक आहे. हे दादाजींच्या ज्ञानाच्या आधाराने समजून घ्यायला हवे की, माझीच चूक असेल म्हणूनच ती शिव्या देते. अर्थात् सासूचा दोष काढायला जावू नये. सासूचा दोष काढल्याने गुंता वाढतो, कॉम्प्लेक्स होते आणि सासूला सून त्रास देत असेल तर सासूने दादाजींच्या ज्ञानाच्या आधारे समजून घ्यायला हवे की भोगतो त्याची चूक. त्यामुळे मलाच निभावून घ्यायला हवे.

सुटका करून घ्यायची असेल तर जे काही कडू-गोड (शिव्या, अपमान वगैरे) येईल ते जमा करून टाका, म्हणजे तुमचा हिशोब पूर्ण होईल. या जगात हिशोबाशिवाय नजरेस नजरही मिळत नाही! तर मग बाकी सगळे काय हिशोबाशिवाय होत असेल का? तुम्ही ज्यांना जेवढे दिले असेल तेवढे सर्व ते तुम्हाला परत देतील. तेव्हा तुम्ही खुश होऊन जमा करून टाका आणि म्हणा, बरे झाले! आता माझा हिशोब चुकता होईल! आणि जर चूक कराल तर पुन्हा भोगावेच लागेल!

स्वत:च्या चुकीनेच मार खातात. ज्याने दगड मारला त्याची चूक नाही पण ज्याला दगड लागला त्याची चूक. तुमच्या आजूबाजूची मुले वाटेल तशा चुका किंवा दुष्कृत्य करत असतील पण तुमच्या वर त्याचा परिणाम होत नसेल तर ती तुमची चूक नाही. परंतु जर तुमच्यावर परिणाम झाला तर ती तुमची चूक आहे, हे नक्कीच समजून जावे!

## असे पृथक्करण तर करा

चूक कोणाची आहे? तेव्हा म्हणे, कोण भोगत आहे हे शोधून काढा. नोकराच्या हातून दहा ग्लास फूटले तर त्याचा परिणाम घरातील माणसांवर होणार की नाही? आता घरातील माणसांमध्ये मुले तर काही भोगत नाहीत, पण त्यांचे आई-वडील मात्र चिडत राहतात. त्यातही आई थोड्यावेळाने निवांत झोपेले, परंतु त्याचे वडील हिशोब करीत राहतात. दहा गुणीले पाच, पन्नास रुपयांचे नुकशान झाले! तो जास्ट एलर्ट (जागृत) आहे म्हणून जास्त दु:खं भोगेल. त्यावरुन 'भोगतो त्याची चूक.' तो जर इतके पृथ्थकरण करत करत पुढे चढत गेला तर सरळ मोक्षाला पोहोचेल.

**प्रश्नकर्ता :** कित्येक लोक असे असतात की आम्ही कितीही चांगले वागलो तरी ते समजून घ्यायला मागत नाही.

**दादाश्री :** जे दुसऱ्यांची चूक पाहतात ते साफ खोटे आहे. स्वत:च्या चुकीमुळेच निमित्त भेटतो. हे तर जिवंत निमित्त भेटला तर त्याला चावायला धावतात. पण मग काटा लागला तर काय कराल? भर चौकात काटा पडलेला आहे, हजारो माणसे तेथून जातात, कोणालाही काटा रूतत नाही, परंतु चंदु तेथून निघताच काटा जरी वाकडा असेल तरी त्याच्या पायात रूतेल. 'व्यवस्थित शक्ती' तर कशी आहे? ज्याला काटा लागायचा असेल त्यालाच लागेल. त्यासाठी सर्व संयोग एकत्र करुन देते, परंतु यात निमित्ताचा काय दोष?

कोणी विचारले की मी माझ्या चुका कशा ओळखू? तेव्हा आम्ही त्याला शिकवतो की तुला जिथे जिथे दु:खं भोगावे लागत आहे, तिथे तुझी चूक आहे. तुझी अशी कोणती चूक झाली असेल की तुला असे भोगायची वेळ आली हे तू शोधून काढ.

## मूळ चूक कुठे आहे?

चूक कोणाची? जो भोगतो त्याची! कोणती चूक? तर 'मी चंदुभाऊ आहे' ही तुमची मान्यताच चुकीची आहे कारण या जगात कुणीच दोषी नाही, म्हणून कोणी गुन्हेगारही नाही, असे सिद्ध होते.

दु:खं देणारा तर फक्त निमित्त आहे. परंतु मुळात चूक स्वत:चीच असते. जो फायदा मिळवून देतो तोही निमित्त आहे आणि जो नुकसान करवतो तोही निमित्तच आहे, हा सगळा आपलाच हिशोब आहे, त्यामुळेच हे सारे घडत असते.

❖❖❖❖❖

# प्रतिक्रमण

## स्वतःचे दोष धुण्याचे साधन-प्रतिक्रमण

## क्रमण-अतिक्रमण-प्रतिक्रमण

संसारात जे काही घडत आहे ते क्रमण आहे. जोपर्यंत ते सहजरुपाने होते तोपर्यंत क्रमण आहे परंतु जर एक्सेस (जास्त) झाले तर ते अतिक्रमण म्हटले जाईल, आणि ज्याच्याप्रति अतिक्रमण झाले असेल त्याच्यापासून सुटायचे असेल तर त्याचे प्रतिक्रमण करावेच लागेल, अर्थात (दोष) धुवावे लागेल, तरच स्वच्छ होईल. मागच्या जन्मात भाव केला असेल की अमक्यास चार थोबडीत मारायच्या आहेत, त्या कारणामुळे ह्या जन्मात जेव्हा ते रूपकमध्ये येते तेव्हा चार थोबाडीत मारल्या जातात. त्यास अतिक्रमण झाले असे म्हणतात, म्हणून त्याचे प्रतिक्रमण करावे लागेल. समोरच्या व्यक्तीच्या शुद्धात्म्याला आठवून झालेल्या दोषांचे प्रतिक्रमण करायला पाहिजे.

काही खराब आचरण झाले त्यास अतिक्रमण म्हणतात. जे खराब आचरण झाले तो तर डाग आहे, नंतर तो मनातल्या मनात टोचत राहतो. त्यास धुण्यासाठी प्रतिक्रमण करावे लागतात. या प्रतिक्रमणाने तर समोरच्या व्यक्तीचा सुद्धा आपल्यासाठी भाव बदलून जातो. स्वतःचे भाव चांगले होतात व समोरच्या व्यक्तीचेही भाव चांगले होतात. कारण प्रतिक्रमाणामध्ये तर इतकी शक्ती आहे की वाघ सुद्धा कुत्र्यासारखा होऊन जातो. प्रतिक्रमण केव्हा कामात येते? जेव्हा काही उलट परिणाम आले तेव्हाच कामात येत असते.

## प्रतिक्रमणाची यथार्थ समज

प्रतिक्रमण म्हणजे काय? प्रतिक्रमण म्हणजे समोरचा जो आपला अपमान करत आहे, ते आपण समजून घ्यायला पाहिजे की या अपमानाचा

गुन्हेगार कोण आहे? अपमान करणारा गुन्हेगार आहे की भोगणारा गुन्हेगार आहे, हे आपणास प्रथम नक्की करायला पाहिजे. तर यात अपमान करणारा हा बिलकूल पण गुन्हेगार नसतो. एक सेंट (प्रतिशत) पण गुन्हेगार नसतो. तो निमित्त असतो आणि आपल्याच कर्माच्या उदयाधीन तो निमित्त भेटतो. अर्थात् आपलाच गुन्हा आहे. आपल्याला आता त्याच्यासाठी खराब भाव होत आहेत एवढ्यासाठीच प्रतिक्रमण करायला हवे. तो नालायक आहे, लबाड आहे, असे विचार मनात आले असतील तर प्रतिक्रमण करायचे. जर आपल्याला कोणी शिवी दिली तर तो आपलाच हिशोब आहे, तो तर निमित्त आहे. खिसा कापला तर तो कापणारा निमित्त आहे आणि आपलाच हिशोब आहे. हा तर निमित्तालाच चावा घालत असतो आणि त्याचीच भांडणे आहेत ही सर्व.

दिवसभरात जो व्यवहार करत असतो त्यात काही चुकीचा (उल्टा) व्यवहार झाला असेल तर आपल्याला ते माहित पडते की याच्यासोबत चुकीचा व्यवहार झाला आहे. माहित पडते की नाही? आपण जो व्यवहार करत असतो, ते सर्व क्रमण आहे. क्रमण म्हणजे व्यवहार. आता जर कोणासोबत चुकीचा व्यवहार झाला, तेव्हा आपल्याला कळते की याच्यासोबत कडक शब्द बोलले गेले किंवा चुकीचे वागलो. कळते की नाही कळत? तर ते अतिक्रमण म्हटले जाते.

अतिक्रमण म्हणजे आपण उलट चाललो. आणि तितकेच सरळ परत फिरणे त्याचे नाव प्रतिक्रमण.

## प्रतिक्रमणाची यथार्थ विधी

**प्रश्नकर्ता :** प्रतिक्रमणात काय करायचे असते?

मन-वचन-कायेचा योग, भावकर्म-द्रव्यकर्म-नोकर्म, चंदुभाऊ आणि चंदुभाऊच्या नावाची सर्व मायेपासून भिन्न अशा 'शुद्धात्मा'ला स्मरून म्हणायचे की, 'हे शुद्धात्मा भगवान, माझ्याने कडक बोलले गेले

ती चूक झाली, त्यासाठी त्याची माफी मागत आहे, आणि ती चूक पुन्हा करणार नाही असा निश्चय करीत आहे. पुन्हा कधी अशी चूक न होवो अशी मला शक्ती द्या.' 'शुद्धात्मा' ला स्मरून किंवा 'दादा'ला स्मरून म्हणायचे की, 'ही चूक झाली' अर्थात् ती आलोचना आहे आणि ती चूक धुवून टाकायची हे प्रतिक्रमण आणि ती चूक पुन्हा करणार नाही, असा निश्चय करायचा, ते प्रत्याख्यान आहे. समोरच्या व्यक्तीला नुकसान होईल असे करणे किंवा त्याला आपल्यापासून दु:खं होईल असे वागणे हे सर्व अतिक्रमण आहे. त्याचे लगेचच आलोचना प्रतिक्रमण, प्रत्याख्यान करावे लागते.

❖❖❖❖❖

## निष्पक्षपाती त्रिमंदिर कशासाठी?

जेव्हा मूळ पुरुष जसे की श्री. महावीर भगवान, श्री कृष्ण भगवान, श्री राम भगवान देहधारी अवस्थेत, सशरीर उपस्थित असतात तेव्हा ते लोकांना धर्मासंबंधी मतमतांतरातून बाहेर काढून आत्मधर्मात स्थिर करतात. परंतु काळक्रमानुसार मूळ पुरुषांच्या अनुपस्थितीमुळे हळू हळू लोकांमध्ये मतभेद उदभवतात व त्यामुळे धर्मात वाडे-संप्रदायांचे निर्माण होतात ज्याच्या परिणामस्वरूप सुख आणि शांतीचा क्रमशः लोप होतो.

अक्रम विज्ञानी परमपूज्य श्री दादा भगवानांनी (दादाश्रींनी) लोकांना आत्मधर्माची प्राप्ती तर करवून दिली पण त्याचबरोबर धर्मात व्याप्त 'माझे-तुझे' ची भांडणे मिटवण्यासाठी आणि लोकांना धार्मिक पक्षपातच्या दुराग्रहाच्या जोखिमेतून बाहेर काढण्यासाठी एक अगदी वेगळेच, क्रांतिकारी पाऊल उचलले. जे आहे संपूर्ण निष्पक्षपाती धर्म संकुलाचे निर्माण.

मोक्षाच्या ध्येयाची पूर्णाहुती हेतू श्री महावीर स्वामी भगवानांनी जगाला आत्मज्ञान प्राप्तीचा मार्ग दाखविला होता. श्री कृष्णभगवानांनी गीता उपदेशामध्ये अर्जुनास 'आत्मवत सर्वभूतेषु' ची दृष्टी प्रदान केली होती. जीव आणि शिव यांचा भेद मिटल्यावरच आपण स्वतःच शिव स्वरूप होऊन 'चिदानंद रूपः शिवोहम् शिवोहम्' ही दशा प्राप्त करतो. अशाप्रकारे सर्व धर्मांच्या मूळ पुरुषांच्या हृदयातील गोष्ट ही आत्मज्ञान प्राप्तीचीच होती. जर ही गोष्ट समजली तर आत्मज्ञान प्राप्तीच्या पुरुषार्थाची सुरुवात होते. आणि प्रत्येकास आत्मदृष्टीने पाहिल्यामुळे अभेदता उत्पन्न होते. कोणत्याही धर्माचे खंडन-मंडन होऊ नये, कोणत्याही धर्माचा प्रमाण दुखावला जाऊ नये अशी भावना निरंतर राहत असते.

परम पूज्य दादाश्री म्हणत असत की जाणते-अजाणतेपणी ज्यांची ज्यांची विराधना झालेली असेल, त्या सर्वांची आराधना केल्यामुळे सर्व विराधना धुतल्या जातात. अशा निष्पक्षपाती त्रिमंदिर संकुलात प्रवेश करून

तेथे विराजमान सर्व भगवंताच्या मुर्त्यांसमोर जेव्हा सहजरूपाने दोन्ही हात जोडून आपण नतमस्तक होतो तेव्हा आतील सर्व पक्षपात, पकड, दुराग्रह, भेदभावपूर्ण मान्यता गळून पडतात व निराग्रही होता येते.

दादा भगवान परिवाराचे मुख्य केंद्र त्रिमंदिर अडालज येथे (अहमदाबाद-महेसाणा हाइवे वर) स्थित आहे. तसेच गुजरातमधील अहमदाबाद, राजकोट, मोरबी, भूज, गोधरा, भादरण, चलामली आणि वासणा (जि. बडौदा) सुरेन्द्रनगर इत्यादी स्थानांवर सुद्धा निष्पक्षपाती त्रिमंदिराचे निर्माण झाले आहे, मुंबई आणि जामनगर येथे त्रिमंदिराचे निर्माण कार्य सुरु आहे.

## ज्ञानविधी काय आहे?

☞ ज्ञानविधी हा भेदज्ञानाचा प्रयोग आहे, जो नेहमीच्या प्रश्नोत्तरी सत्संगापेक्षा वेगळाच आहे.

☞ १९५८ साली परम पूज्य दादा भगवानांना जे आत्मज्ञान प्रकट झाले तेच आत्मज्ञान आज सुद्धा त्यांच्या कृपेमुळे आणि पूज्य निरुमांच्या आशीर्वादाने पूज्य दीपकभाई यांच्या माध्यमातून सर्वांना प्राप्त होत आहे.

## ज्ञान का घेतले पाहिजे?

☞ जन्म मरणाच्या चक्रातुन मुक्त होण्यासाठी.

☞ स्वत:चा आत्मा जागृत करण्यासाठी.

☞ कौटुंबिक संबंध आणि काम-काजात सुख आणि शांती अनुभवण्यासाठी.

## ज्ञानविधीतून काय प्राप्त होते?

☞ आत्मजागृती उत्पन्न होते.

☞ योग्य समज प्राप्त होते ज्यामुळे संसार व्यवहार सुरळीतपणे पूर्ण करण्याच्या चाव्या मिळतात.

☞ अनंतकाळाची पापं भस्मीभूत होतात.

☞ अज्ञान मान्यता दूर होतात.

☞ ज्ञानजागृतीमध्ये राहिल्याने नवीन कर्मबंधन होत नाहीत आणि जुनी कर्म संपत जातात.

## आत्मज्ञान प्राप्तीसाठी प्रत्यक्ष येणे आवश्यक आहे?

☞ आत्मज्ञान ज्ञानींची कृपा आणि आशीर्वादाचे फळ आहे. त्यासाठी प्रत्यक्ष येणे आवश्यक आहे.

☞ पुज्य नीरूमा आणि पूज्य दीपकभाई यांचे टी.व्ही आणि व्हीसीडी सत्संग कार्यक्रम आणि दादाजींची पुस्तके ज्ञानाची पूर्वभूमिका तयार करू शकतात परंतु आत्मसाक्षात्कार घडवू शकत नाही.

☞ इतर साधनांनी शांति अवश्य मिळते. परंतु ज्या प्रमाणे पुस्तकातील दिव्याचे चित्र प्रकाश देऊ शकत नाही परंतु प्रत्यक्ष प्रज्वलित दिवाच प्रकाश देऊ शकतो, त्याच प्रकारे आत्मा जागृत करून घेण्यासाठी तर स्वत: येऊन ज्ञान प्राप्त करून घ्यावे लागते.

☞ **ज्ञान प्राप्तीसाठी तुम्हाला धर्म किंवा गुरु बदलण्याची गरज नाही.**

☞ **ज्ञान अमुल्य आहे तेव्हा ज्ञान प्राप्तीसाठी कोणतेही मुल्य द्यावे लागत नाही.**

# श्री सीमंधर स्वामींची आरती

जय 'सीमंधर स्वामी, प्रभु तीर्थंकर वर्तमान,
महाविदेह क्षेत्रे विचरता, ( २ ) भरत ऋणानुबंध. जय...

'दादा भगवान' साक्षीए, पहोंचाडुं नमस्कार ( २ ) ...( स्वामी )
प्रत्यक्ष फळ पामुं हुं, ( २ ) माध्यम ज्ञान अवतार. जय...

पहेली आरती स्वामीनी, ॐ परमेष्टि पामे ( २ ) ...( स्वामी )
उदासीन वृत्ती वहे, ( २ ) कारण मोक्ष सेवे. जय...

बीजी आरती स्वामीनी, पंच परमेष्टि पामे ( २ ) ...( स्वामी )
परमहंस पद पामी, ( २ ) ज्ञान-अज्ञान लणे. जय...

त्रीजी आरती स्वामीनी, गणधर पद पामे ( २ ) ...( स्वामी )
निराश्रित बंधन छूटे, ( २ ) आश्रित ज्ञानी थये. जय...

चोथी आरती स्वामीनी, तीर्थंकर भावि ( २ ) ...( स्वामी )
स्वामी सत्ता 'दादा' कने, ( २ ) भरत कल्याण करे. जय...

पंचमी आरती स्वामीनी, केवळ मोक्ष लहे ( २ ) ...( स्वामी )
परम ज्योति भगवंत 'हुं', ( २ ) अयोगी सिद्धपदे. जय...

एक समय स्वामी खोळे जे, माथुं ढाळी नमशे ( २ )...( स्वामी )
अनन्य शरणुं स्वीकारी, ( २ ) मुक्तिपदने वरे. जय...

❖ ❖ ❖

सीमंधर स्वामींचा असीम जयजयकार हो

# शुद्धात्म्या प्रति प्रार्थना

(दररोज एकवेळा बोलायची)

हे अंतर्यामी परमात्मा! आपण प्रत्येक जीवमात्रांमध्ये विराजमान आहात, तसेच माझ्यामध्ये पण विराजमान आहात, आपले स्वरूप हेच माझे स्वरूप आहे, माझे स्वरूप शुद्धात्मा आहे.

हे शुद्धात्मा भगवान! मी आपल्याला अभेदभावे अत्यंत भक्तिपूर्वक नमस्कार करीत आहे.

अज्ञानतेमुळे मी जे जे ★★दोष केले आहेत, त्या सर्व दोषांना आपल्या समक्ष जाहीर करीत आहे. त्यांचा ह्रदयपूर्वक खूप पश्चाताप करीत आहे आणि आपल्याजवळ क्षमा प्रार्थित आहे. हे प्रभू! मला क्षमा करा, क्षमा करा, क्षमा करा आणि पुन्हा असे दोष करू नये अशी आपण मला शक्ति द्या, शक्ति द्या, शक्ति द्या.

हे शुद्धात्मा भगवान ! आपण अशी कृपा करा की आमचे भेदभाव मिटून जावेत आणि अभेद स्वरूप प्राप्त व्हावे. आम्ही आपल्यात अभेद स्वरूपाने तन्मायाकार राहू.

★★ (जे जे दोष झाले असतील ते मनात जाहीर करावे.)

# प्रतिक्रमण विधी

प्रत्यक्ष दादा भगवानांच्या साक्षीने देहधारी...... (ज्याच्या प्रति दोष झाला असेल त्या व्यक्तिचे नाव) च्या मन-वचन-कायेचे योग, भावकर्म, द्रव्यकर्म, नोकर्माहून भिन्न असे हे शुद्धात्मा भगवान! आपल्या साक्षीने, आजच्या दिवसापर्यंत जे जे ★★ दोष झाले आहेत, त्यांची क्षमा मागत आहे, हृदयपूर्वक खूप पश्चाताप करीत आहे. मला क्षमा करा, क्षमा करा, क्षमा करा. आणि पुन्हा असे दोष कधीही करणार नाही, असा दृढ निश्चय करीत आहे, त्यासाठी मला परम शक्ति द्या.

★★ क्रोध-मान-माया-लोभ, विषय-विकार, कषाय इत्यादीपासून त्या व्यक्तिला दु:ख दिले गेले असेल, त्या सर्व दोषांना मनात आठवायचे.

# नऊ कलमे

(दररोज तीन वेळा बोलायची)

१. हे दादा भगवान! मला कोणत्याही देहधारी जीवात्म्याचा किंचितमात्र पण अहम् दुभावणार (दुखावणार) नाही, दुभाविला जाणार नाही किंवा दुभावण्या प्रति अनुमोदन केले जाणार नाही अशी परम शक्ति द्या.

मला कोणत्याही देहधारी जीवात्म्याचा किंचितमात्र पण अहम् दुभावणार नाही अशी स्याद्वाद वाणी, स्याद्वाद वर्तन आणि स्याद्वाद मनन करण्याची परम शक्ति द्या.

२. हे दादा भगवान! मला कोणत्याही धर्माचे किंचितमात्र पण प्रमाण दुभावणार नाही, दुभावले जाणार नाही किंवा दुभावण्या प्रति अनुमोदन केले जाणार नाही अशी परम शक्ति द्या.

मला कोणत्याही धर्माचे किंचितमात्र पण प्रमाण दुभावले जाणार नाही, अशी स्याद्वाद वाणी, स्याद्वाद वर्तन आणि स्याद्वाद मनन करण्याची परम शक्ति द्या.

३. हे दादा भगवान! मला कोणत्याही देहधारी उपदेशक, साधु, साध्वी किंवा आचार्य यांचा अवर्णवाद, अपराध, अविनय न करण्याची परम शक्ति द्या.

४. हे दादा भगवान! मला कोणत्याही देहधारी जीवात्म्या प्रति किंचितमात्र पण अभाव, तिरस्कार कधीही केला जाणार नाही, करविला जाणार नाही किंवा कर्त्याच्या प्रति अनुमोदन केले जाणार नाही अशी परम शक्ति द्या.

५. हे दादा भगवान! मला कोणत्याही देहधारी जीवात्म्याशी कधीही कठोर भाषा, तंतीली (टोचणारी) भाषा न बोलण्याची, न

बोलावयाची किंवा बोलण्या प्रति अनुमोदन न करण्याची अशी परम शक्ति द्या.

कोणी कठोर भाषा, तंतीली भाषा बोलले तर मला मृदु-ऋजु भाषा बोलण्याची परम शक्ति द्या.

६. हे दादा भगवान ! मला कोणत्याही देहधारी जीवात्म्या प्रति स्त्री-पुरुष किंवा नपुंसक, कोणताही लिंगधारी असो, तर त्यांच्या संबंधी किंचितमात्र पण विषयविकार संबंधी दोष, इच्छा, चेष्टा-चाळे किंवा विचार संबंधी दोष न करण्याची, न करविण्याची किंवा कर्त्याच्या प्रति अनुमोदन न करण्याची अशी परम शक्ति द्या.

मला निरंतर निर्विकार राहण्याची परम शक्ति द्या.

७. हे दादा भगवान! मला कोणत्याही रसामध्ये लुब्धपणा न करण्याची अशी शक्ति द्या. समरसी आहार घेण्याची परम शक्ति द्या.

८. हे दादा भगवान ! मला कोणत्याही देहधारी जीवात्म्याचा प्रत्यक्ष किंवा परोक्ष, जिवंत किंवा मृत्यु पावलेल्या, कोणाचाही किंचितमात्र पण अवर्णवाद, अपराध, अविनय केला जाणार नाही, करविला जाणार नाही किंवा कर्त्या प्रति अनुमोदन केले जाणार नाही अशी परम शक्ति द्या.

९. हे दादा भगवान! मला जगत कल्याण करण्याचे निमित्त बनण्याची परम शक्ति द्या, शक्ति द्या, शक्ति द्या.

(एवढेच तुम्ही दादा भगवान यांच्याजवळ मागायचे. ही दररोज मेकॅनिकली (यंत्रवत्) वाचण्याची वस्तू नाही, अंतरात ठेवण्याची वस्तू आहे. ही दररोज उपयोगपूर्वक भावना करण्याची वस्तू आहे. एवढ्या पाठात सर्व शास्त्रांचे सार येऊन जाते.)

❖ ❖ ❖

## दादा भगवान फाउन्डेशनची प्रकाशित पुस्तके

### मराठी

१. भोगतो त्याची चूक
२. एडजस्ट एवरीव्हेर
३. जे घडले तोच न्याय
४. संघर्ष टाळा
५. मी कोण आहे ?
६. क्रोध
७. चिंता
८. प्रतिक्रमण
९. भावना सुधारे जन्मोजन्म
१०. कर्माचे विज्ञान
११. पाप-पुण्य
१२. आई-वडील आणि मुलांचा व्यवहार
१३. पति-पत्नीचा दिव्य व्यवहार
१४. समजपूर्वक प्राप्त ब्रह्मचर्य
१५. मानव धर्म
१६. मृत्युवेळी, आधी आणि नंतर
१७. सेवा-परोपकार
१८. दान
१९. त्रिमंत्र
२०. वर्तमान तीर्थंकर श्री सीमंधर स्वामी
२१. चमत्कार
२२. सत्य-असत्याचे रहस्य
२३. वाणी, व्यवहारात
२४. पैशांचा व्यवहार

### हिन्दी

१. ज्ञानी पुरुष की पहचान
२. सर्व दु:खों से मुक्ति
३. कर्म का सिद्धांत
४. आत्मबोध
५. मैं कौन हूँ ?
६. वर्तमान तीर्थंकर श्री सीमंधर...
७. भुगते उसी की भूल
८. एडजस्ट एवरीव्हेयर
९. टकराव टालिए
१०. हुआ सो न्याय
११. चिंता
१२. क्रोध
१३. प्रतिक्रमण
१४. दादा भगवान कौन ?
१५. पैसों का व्यवहार
१६. अंत:करण का स्वरूप
१७. जगत कर्ता कौन ?
१८. त्रिमंत्र
१९. भावना से सुधरे जन्मोंजन्म
२०. प्रेम
२१. माता-पिता और बच्चों का व्यवहार
२२. समझ से प्राप्त ब्रह्मचर्य
२३. दान
२४. मानव धर्म
२५. सेवा-परोपकार
२६. मृत्यु समय, पहले और पश्चात
२७. निजदोष दर्शन से... निर्दोष
२८. पति-पत्नी का दिव्य व्यवहार
२९. क्लेश रहित जीवन
३०. गुरु-शिष्य
३१. अहिंसा
३२. सत्य-असत्य के रहस्य
३३. चमत्कार
३४. पाप-पुण्य
३५. वाणी, व्यवहार में...
३६. कर्म का विज्ञान
३७. आप्तवाणी-१ से ९
३८. आप्तवाणी-१३ (पूर्वार्ध और उत्तरार्ध)
३८. समझ से प्राप्त ब्रह्मचर्य (पूर्वार्ध और उत्तरार्ध)

★ दादा भगवान फाउन्डेशन द्वारे गुजराती, हिन्दी आणि इंग्रजी भाषेत सुद्धा बरीच पुस्तके प्रकाशित झाली आहे. वेबसाइट www.dadabhagwan.org वर सुद्धा आपण ही सगळी पुस्तके प्राप्त करू शकता।

★ प्रत्येक महिन्यात हिन्दी, गुजराती आणि इंग्रजी भाषेत दादावाणी मेगेझीन प्रकाशित होत आहे.

# संपर्क सूत्र

## दादा भगवान परिवार

| | | |
|---|---|---|
| **अडालज** | : | **त्रिमंदिर**, सीमंधर सिटी, अहमदाबाद-कलोल हाईवे, पोस्ट : अडालज, जि.-गांधीनगर, गुजरात - 382421. फोन : (079) 39830100 |
| **राजकोट** | : | **त्रिमंदिर**, अहमदाबाद-राजकोट हाईवे, तरघड़िया चोकड़ी (सर्कल), पोस्ट : मालियासण, जि.-राजकोट. फोन : 9924343478 |
| **भुज** | : | **त्रिमंदिर**, हिल गार्डनच्या मागे, एयरपोर्ट रोड. फोन : (02832) 290123 |
| **अंजार** | : | **त्रिमंदिर**, अंजार-मुंद्रा रोड, सिनोग्रा पाटीया जवळ, सिनोग्रा गाँव, ता-अंजार. फोन : 9924346622 |
| **मोरबी** | : | **त्रिमंदिर**, मोरबी-नवलखी रोड, पो-जेपुर, ता-मोरबी, जि-राजकोट, फोन : (02822) 297097 |
| **सुरेन्द्रनगर** | : | **त्रिमंदिर**, सुरेन्द्रनगर-राजकोट हाईवे, लोकविद्यालय जवळ, मुळी रोड. फोन : 9737048322 |
| **अमरेली** | : | **त्रिमंदिर**, लीलीया बायपास चोकडी, खारावाडी. फोन : 9924344460 |
| **गोधरा** | : | **त्रिमंदिर**, भामैया गाँव, एफसीआई गोडाउन समोर, गोधरा, (जि.-पंचमहाल). फोन : (02672) 262300 |
| **बडोदा** | : | **त्रिमंदिर**, बाबरिया कोलेज जवळ, बडोदा-सुरत हाई-वे NH-8, वरणामा गाँव. फोन : 9574001557 |
| **अहमदाबाद** | : | **दादा दर्शन**, ५, ममतापार्क सोसाइटी, नवगुजरात कॉलेजच्या मागे, उस्मानपुरा, अहमदाबाद-380014. फोन : (079) 27540408 |
| **बडोदा** | : | **दादा मंदिर**, १७, मामानी पोळ-मुहल्ला, रावपुरा पुलिस स्टेशन समोर, सलाटवाड़ा, बडोदा. फोन : 9924343335 |

| | | | |
|---|---|---|---|
| **मुंबई** | : 9323528901 | **दिल्ली** | : 9810098564 |
| **कोलकता** | : 9830093230 | **चेन्नई** | : 9380159957 |
| **जयपुर** | : 9351408285 | **भोपाल** | : 9425024405 |
| **इन्दौर** | : 9039936173 | **जबलपुर** | : 9425160428 |
| **रायपुर** | : 9329644433 | **भिलाई** | : 9827481336 |
| **पटना** | : 7352723132 | **अमरावती** | : 9422915064 |
| **बेंगलूर** | : 9590979099 | **हैदराबाद** | : 9989877786 |
| **पूणे** | : 9422660497 | **जालंधर** | : 9814063043 |

**U.S.A.** : **(D.B.V. I.)** +1 877-505-DADA (3232)

| | | | |
|---|---|---|---|
| **U.K.** | : +44 330-111-DADA (3232) | **UAE** | : +971 557316937 |
| **Kenya** | : +254 722 722 063 | **Singapore** | : +65 81129229 |
| **Australia** | : +61 421127947 | **New Zealand** | : +64 210376434 |

**Website : www.dadabhagwan.org**



# ज्ञानविधी

ज्ञानविधी ही अनंत जन्मांपासून स्वत:च्या स्वरुपाची म्हणजे आत्म्याची अनुभूति करण्यासाठी आसुसलेल्या मुमुक्षुंकरीता ज्ञानी पुरुष दादा भगवानांची अक्रम विज्ञानाद्वारे दिलेली अनमोल भेट आहे. ज्ञानविधी ह्या मी ( आत्मा ) आणि माझे ( मन-वचन-काया ) यात भेदरेखा आखणारा, ज्ञानी पुरुषाच्या विशेष आध्यात्मिक सिद्धीद्वारे होणारा वैज्ञानिक ज्ञान प्रयोग आहे. या आत्मज्ञानाने शाश्वत परमानंदाची प्राप्ती होते तसेच चिंतेपासून मुक्ती मिळू लागते. त्याचबरोबर व्यावहारिक गुंता सोडवण्यासाठी सुद्धा उपयोगी ठरते त्यामुळे मग सांसारिक संबंधही शांतीपूर्ण होतात.

- दादाश्री

dadabhagwan.org

ISBN 978-93-86321-94-7

9 789386 321947

Printed in India

Price ₹10